गणपुले फाऊंडेशन प्रस्तुत

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्ष १ | अंक – दुसरा




प्रकाशन दिनांक : फाल्गुन कृ. १३/१४ | ७ एप्रिल २०२४

# साद चित्पावनीचो

चित्पावनी त्रैमासिक, वर्ष १ | अंक – दुसरा

संपादिका

सौ. आरती मोने

प्रमुख मार्गदर्शक

श्री. अशोक नेने

सल्लागार मंडळ

श्री. वासुदेव दामले, श्री. सुधीर गोरे, डॉ. सौ. अनुश्री गणपुले

मुखपृष्ठ

गणपुले फाऊंडेशन

संकलन, अक्षर जुळवणी, प्रकाशन

गणपुले फाऊंडेशन

साहित्य पाठविण्या साठी..

info@ganpulefoundation.org

व्हॉटस्ॲप: +९१ ९९२० ३४५८६१

टीप:

साहित्य पाठवीताना, टाईप करून पाठवावं. स्कॅन
किव्वा pdf रूपात पाठऊ नये.

© गणपुले फाऊंडेशन.
या अंकातील मजकूर; लेखक आणि प्रकाशक यांच्या
नावाशिवाय प्रसारित करू नये.

या अंकात वापरण्यात आलेली चित्रे इंटरनेट वरून घेण्यात आली
आहेत. सर्व चित्रांचे कॉपी राईट मूळ लेखकांचे व संकेत स्थळांचे
आहेत.

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत
असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका

संपादकीय....४
गणपुले फाऊंडेशन चे वतीन....६
कबुतरां....७
कलईची आयदणां....१०
गुड्डयो....११
वेळ....१३
बदलापूर गावाची थोडकेत माहिती....१६
नातवंडा....१७
बाप नावाचा बेट....१८
देवभूमी उत्तराखंड प्रवास वर्णन....२४
नीलिमा....२५
पण.. ती....२७
धगधगता अग्निकुंड सावरकर....२८
पादगया क्षेत्र....३०
चित्पावनी शब्द कोडा....३३
माहेरवाशीणीचा मनोगत....३४
भिंग भंगी बिंग....३५
श्री आगमन....३८
संत भगवान श्री श्री गोपालबाबा महाराज....३९
निर्णय तुमचो....४०
आठवणी....४२
नेगेटिव्ह एनर्जी....४३
शब्द कोड्याचा उत्तर....४६



# संपादकीय

चित्पावनी भाषा अभ्यास, तेच बरोबर चित्पावनी साहित्य निर्मिती अणि भाषाचो प्रसार हे तिनय धारांचो आगळोवेगळो संगम म्हणजेच, "साद चित्पावनीचो" अंक एप्रिल २०२४.

"मनात सलां तरीय तां विचारांनी फुलवीन, कमी अधिक सलां तरीय त्याला लेखणीत्थीन आकार देन!" असे भावार्थाचा लेखन हे अंकात से. प्रत्येक लेखक लेखिकेन आपले विचारात्थीन घडयलेली चित्पावनीची सुबक आकृती से. जणू चित्पावनी भाषांत, 'शाब्दिक कलाकृती घडयणारी कलाकार' असां म्हणेवां लागेल. असो हो सगळेंचे सहकार्यान तयार जालेलो दुसरो चित्पावनी अंक, 'साद चित्पावनीचो' एप्रिल २०२४.

लख्ख शब्दज्योती उजळतील अख्खे विश्वात |
जेड्ला चित्पावनीचो अंक पावेल घराघरांत ||

नमस्कार !

चित्पावनी दुसरो अंक पूर्ण हंव्नी, प्रकाशनाचो दिवस उजाड्लो म्हणी खूप आनंद से अणि अभिमान से.

दुसरे अंकाची घोषणा केली ते नंतर कार्याला खरी सुरूवात जाली. पयले अंका पेक्षा दुसरो अंक कसो सैव्वो हे संदर्भात सल्लागार मंडळ अणि गणपुले फाऊंडेशन मिळोनीं (ऑनलाईन) चर्चा जाली. सगळेंनी मदतीची तयारी दाखोव्नी आमची उमेद वाढयली. पयले अंकापेक्षा हेंत थोडे बदल केले, अणि चित्पावनी साहित्यिकांसाठी पत्रक जाहीर केलां. लिव्हणारेनी आपले साहित्याला विषयानुरूप नवां रुप दिलां. हेचांच फलस्वरूप म्हण्जे सरस, चित्रांनी समृद्ध असो हो अंक वाचनीय जालो से.

# .... संपादकीय

सद्दांचे बोलीतले वापरात इडली, दोसा, पावभाजी, वडापाव, रसगुल्ले, गुलाबजाम असे अनेक शब्द, बिनधास्त जिबल्यावर रूढ जालेले सत. इंग्रजांची इंग्रजी अख्ये भारतात रुजलेली से. मोग "पिढ्यांन पिढ्यो बोयली जाणारी 'आपली चित्पावनी बोली' कि त्याला पाठल्यां थेव्वेची ?" त्याचो प्रचार प्रसार अणि संवर्धन करणेसाठी अनेक हात पुढां येव्वे हवे. "हरित क्रांती जाली, खाद्यक्रांती जाली एतां भाषाक्रांती ही हय्वेच हवी तरच त्याचां अस्तित्व टिकोनी ऱ्हेल!" आपली चित्पावनी भाषा अधिक समृद्ध, बळकट हय्वेसाठी सगळेंना एक आव्हान से..! चित्पावनी रसिक मायबाप "भाषाचे बालक व्हा, पालक व्हा अणि लेखक व्हा!"  तरच सांघिक भावना प्रकर्षान जपली जायेल अणि इच्छित साद्य हयेल. वाचकानों ..!! "जगाचे पाठीवर जे जे जागेवर चित्पावनी बांधव वास्तव्य करनीं सत त्याहां त्याहां आपण तेंचे स्वागताला जाय्वेवां, आपलो अंक भेटीदाखल देव्नी तेनां भाषा जतन करे प्रवृत्त करेवां.
भविष्यात 'चंद्रावरसुद्धा'  "चित्पावनी अंक साद चित्पावनीचो"' आपलां सहर्ष स्वागत करीत से ! अशी पाटी लावेची ताकद प्रत्येक चित्पावनी भावा भेणिशींकडा से.

प्रत्येक लेख स्वतंत्र सलो तरीय तेनां 'गुथोनीं थेयणारो चित्पावनीचो धागो' समान से. हे अंकात प्रवासवर्णनां सत, ललित लेख, काल्पनिक लेख ( फँटसी, ) आईचां वात्सल्य, माहेराची ओढ दाखयणांऱ्यो कवितां, अणि बुद्ध्याला व्यायाम देणारां सुरेख चित्पावनी शब्दकोडां,  असे विविधांगान फुल्लेलो हो अंक "साद चित्पावनीचो. "चित्पावनीची गुढी अशीच उंच उंच जाव्दें. आपलेतलां स्नेह, मांगल्य, उत्साह अणि सुख समृद्धी वर्खानवर्ख वाढोंदे असो आशीर्वाद देत ही विजयीपताका आपलो आनंद व्यक्त करीत, हे अंकाचे मुखपृष्ठावर अभिमानान उभी ऱ्हेली से काय असो भास हसे."

अंकाचां सगळां काम करताना इतके लोकांची मदत जाली से कि आभार प्रदर्शन आपलेच माणसांचा कसां कितां करेचां, हे नियमाला फाटो देत ऋणनिर्देश करणार सां. सगळेंत पयली शुभेच्छा, असो अंक काढेचेसाठी बरेंतला बरां साहित्य धाडणारे लेखक, लेखिकानां अणि कवियत्रीना. अंकाची निर्मिती करेचां आश्वासन देव्नी आमचो हुरूप वाढवणारे गणपुले फाऊंडेशन, बारिकसाणीन लेख वाचनी सुचना देणारां सल्लागार मंडळ, तरीय माजोच अंक असां म्हणोनीं तुमी जां सहकार्य देव्वेचा काम केलांसा तेची पोच समजा! अणि माजे कालमर्यादेचे तगादेना न कंटाळता न त्रासता , सगळेपरीन "मदतीला तत्पर सणारो साहित्यिक परिवार." एका फोनावर दिलेली तुमची दाद कौतुकास्पद से.  खरां बघे गेले.. आपले सद्दांचे भौतिक व्याप, भुर्गीबाळां, संसार संभाळनीं वेळांत वेळ काड्नीं लिखाण धाडणारे माजे भावा भेणिशीनों  तुमचे साठी 'धन्यवाद' शब्द अपुरो से.

गोड मानोनीं घ्या! चित्पावनी रसिक वाचकवर्ग, प्रत्येक लेख वाचा, प्रत्येकावर आवर्जूनी अभिप्राय द्या! अंकात अजूनी कितां बदल सैय्वे हवो हेचेबद्दल नक्की कळवा. तुमच्या सुचवण्यांचां स्वागत सयेल.देव बरां करुं.....!!कळेवां,  लोभ सेच !! तो वाढेवो ही सदिच्छा!!

संपादिका ✍️ 🌿

सौ. आरती मोने

# गणपुले फाऊंडेशन चे वतीन

नमस्कार! सगळेंत पयली लेखक, लेखिका, कवी- कवयित्री, संपादक मंडळ, सल्लागार मंडळ अणि तुमी वाचक हेंचा मनापाष्णी अभिनंदन.

'एक कल्पना ते दुसरे अंकाचा प्रकाशन' असो पल्लो आपण सगळेंनी गाठलो से. तुमचे मदतीन हो अंक अशीच यशस्वी वाटचाल करील अशी माला खात्री से.

हे अंकामुळां बरेच लोकांशी संपर्क आयलो अणि बरेच लोकांनी गणपुले फाऊंडेशन बद्दल विचारपुस सुरू केली. सगळेंनी प्रोत्साहन दिलां म्हणीच चित्पावनीचो हो उपक्रम सुरू से.

अंकाचे निमतान गणपुले फाऊंडेशनची माहिती एठा देसां.

विस वर्खापाष्णी, आपल्या संस्कृतीचे जतानासाठी कार्य करेची भावना मनात सली. २७ जुलै २०२३ हे दिवस गणपुले फाऊंडेशन ची स्थापना केली अणि उद्दिष्टा ठरोव्नीं कामाला सुरुवात केली.

हे दिवसाचा महत्व खूप से कारण हो दिवस म्हणजे माजे आजोबा वे. शा. सं. गजानन गणपुले हेंचो पुण्यस्मरण दिन. ल्हान सलेपाष्णी तेंचेनी जे तत्वांची पाळणूक करेचां शिक्षण दिलां ते संस्कारांचो एतापर्यन्त खूप उपयोग जालो.

आपल्या भारतीय संस्कृतीचा जतन अणि ते साठी वेगवेगळे उपक्रम असां उद्दिष्ट घेव्नी गणपुले फाऊंडेशन तुमच्या मदतीन काम करीत ऱ्हेनांर से.

चित्पावनी बोली भाषा जी लुप्त हत चालली से, त्याचो प्रचार अणि प्रसार करणेसाठी गणपुले फाऊंडेशन कार्यरत से. नोवेंबर २०२३ हे म्हयनेत 'चित्पावनीची तोंड ओळख' ही ऑनलाईन कार्यशाळा घेतली म्हणी बरेच भाव भेणीशीना चित्पावनी बद्दल माहिती मिळ्ळी.

श्री. अशोक नेने, सौ. आरती मोने अणि श्री. वासुदेव दामले हे शिक्षकवर्गान मार्गदर्शन केलां म्हणी कार्यशाळा खूप यशस्वी जाली. जसा मराठी साहित्य से तसांच चित्पावनी साहित्य तयार हव्वे हवां म्हणी, हे अंकाची कल्पना सुचली. हो अंक म्हण्जे कार्यशाळा केलेले चित्पावनी साहित्यीकाना एक व्यासपीठ देव्वेचो एक यत्न.

दर तीन म्हयनेन 'साद चित्पावनीचो' हो अंक तुम्ला वाचे मिळणार से. दिवाळी अंक हो विशेष अंक हनांर से. जो पुस्तक रुपांत सनार से. तुमची अशीच मदत मिळत ऱ्हेनांर अणि दिवाळी अंक यशस्वी हनांर हो माला विश्वास से.

अंकाबद्दल तुमच्यो प्रतीक्रिया आम्ला धाडा म्हणजे हे अंकाचो दर्जो वाढत ऱ्हेल.

वैभव गणपुले
संयोजक - गणपुले फाऊंडेशन

# कबुतरां



में ल्हानपणी भुर्गेपणात अशी कर्तुका केली. जी गोष्ट करेची नाय ती मुद्दामहंव्नी करेची असांच घडत गेला, अणि मोग शब्दांचो मार किंवा मुष्टीप्रसाद खावेचो पडलो.

कबुतरा हि गजाल कबुतरा संदर्भात से. आमचे बापायन म्हणजे माझे दादानं एकदा कोणालातरी 'डेगवे' गावात कबुतरा सांग्गीं थेयलिन सली. साल बहुतेक १९६५-६६ सनांर. आमचां आजोळ झोळंबे गावात. तेला लागोनी वर्खात्थीन एक दोनदा तरी तो तेगडा जात सलो. डेगवे गाव बांदेत्थीन झोळंबे जाताना लागसे. ते माणसाचो निरोप येतक्षणी दादा कबुतरा हाडे गेलो. दोन तीन दिवसानी कबुतरा घेवनीं आयलो. कबुतरा दिसें खूप बरी, धवी-फुल, बारीक चोच, निळे दोळे, सारखी पाखां फडफडावीत. तेला लागोनी अणिक बरी दिसत सली. सारखो घुटुर घु असो आवाज करीत. एक नर, एक मादी असा दादान सांग्लेलां में आईकला सलां. मोठे पिंजरेत ती मजात ऱ्हेत सली.

सुरवातीचे थोडे दिवस दादानं स्वतः तेंचि चाकरी केलीन. मोग हळू हळू वैनी (माझी आई) अणि आक्का तेंचि सेवा करु लागली. कारण दादा बहुतेक करनीं बाहेर. कोर्ट कचेरी लागलेलीच सली. माला तेंचे लागी जावे सुद्धा बंदी सली. तेंची चाकरी म्हणजे एका खोल बश्यात पेरांच्यो फोडी, पिके केळेंच्यो फोडी, भिजलेले मूग, वाटाणे, मटकी, भिकणां थेवेची. आदले दिवसाची बशी काडेची. तसोच प्रयोग पाण्याचो. दर आठ दिवसांनी पिंजरो साफ करेचो कारण ती हगोनी पाड करीत अणि तेला अळशीक वास मारी. पिंजरो धोव्वेचां काम दादा करी तेड्ला तेनां थोडो वेळ दुसरे ल्हान पिंजरेत बदली करी. थोडे दिवसांनी कुत्रेला आधी बांधनी घालनी तेनां भायेर काढी. ती पोळोनी जात नतली. तेना दादाची सवय जालेली.

# .... कबुतरां

कुत्रेचां लक्ष कायम कबुतरांवर, तो शेपटी हालवीत रडलेसारखो आवाज करी. कुत्रो गावठी पण आंगानं बरो सलो. शिकारी सलो. म्हयनेत्थीन एकदा तरी वांदर, कटांदर मारी. आमचेकडा काडतूसची बंदूक सली. रानटी प्राणी पिकांची नासाडी करणारे तेडला मारीत. फॉरेस्ट कार्यालय काय विचारीत नतले

आमला म्हणजे माला पिंजरेलागी जावेची, पिंजरो उघडेचि, कबुतरांना हाताळेची बिलकुल परवानगी नतली. पण माला खूप आकर्षण अणी कुतूहल सलां. कबुतरां सगळेंची आवडती जालेली. ती चित्र विचित्र आवाज करीत, पाखां फडफडावीत. वाकड्यो, तिकड्यो मानो करीत. पिंजरेत एक दोन आडव्यो काठयो सल्यो. तेचेवर वरती खालती नाचत. दादा नसताना कबुतरांची चाकरी वैनी, आक्का करीत. दादा आठवडेत्थीन  तीन चारदा डिचोल्या, म्हापसे, पणज्या जाय. वैनी, आक्का तेंची चाकरी करीत सताना में बारीक लक्ष देव्नी बघीत सलो. कबुतरा दोन तीन म्हयनेत बरी घोय्ळी सली.

एक दिवस दादा बरे कपडे करनीं सकाळी बशीचे वेळाला सुटलो. तेचे कपडे वेल्यां ओळखे येत सला कि तो कारोतरी जानांर से. में अंदाज केलो बहुतेक आज दूरचो पल्लो से. वैनीन तेचा अनुमोदन केलान.

 थोडे वेळान, साधारण सकाळी णवाची वेळ. कबुतरांना खाण अणि पाणी देव्वेची वेळ. में आक्काला म्हटला “आज में कबुतरांना बघसां."  पण आक्का, वैनीचो साफ नकार. कारण मे कितांतरी बोवाळ करनांर हे बद्दल तेंची पक्की खात्री सली. तरीसुद्धा में दोन पिकलेली केळी हाड्ली. दोन पेरा हाड्ली. घराचे पाठल्या वाटान एक मोठी पेर सली. केळेंच्यो अणि पेरांच्यो बारीक फोडी केल्यो. थोडी भिकणां, चणे, वाटाणे, मूग घेतले. ते सद्दानीं रात्री भिजत घालीत. में पिंजरे लागी आयलो. वैनी, आक्का कामात सामकी गुल्ल, में बघलां, लागी कोणच नाय. वैनीला खूप काम सत सला. आक्का पण खूप काम करी. संबंध घराचो केरवारो, सारवण, कपडे होळेचे , आबोल्यो शिपेच्यो, बेडे कुडावेचे, गोरवां दूध अणि गोठो साफ करेचो. एक अणि दोन भरपूर कामां.

में ताटली भरली, पिंजरेलागी आयलो. पिंजरो हळूच उघडलो. कबुतरा मोठयान पाखां फडफडाव्नी आवाज करु लागली. एक कबुतर हळूच पिंजरे बाहेर आयला अणि ताटल्याकडा न बघताच सरळ उडोनीं दूर जावनीं बेसला. मग बघसा जाले आमचो कुत्रो शेपटी हालवीत त्यांहाच लागी बुरंगाळीत सलो.

उडोनीं गेलेला कबुतर लागी जाव्नी बघेचां म्हटलां जाले परत उडला अणि अणिक दुर जाव्नी बेसलां. माला शेळो घाम येंव लागलो. में तां कबुतर क्यें जावनी बेसला म्हणी बघे ऱ्हेलो जाले दुसरे वाटान दूसरा कबुतर पिंजरेत्थीन बाहेर येव्वे अणि कुत्रो त्याहा पावे एक गाठ जाली, कुत्रेन तेला आपले तोंडात घट्ट धरनीं घराचे पाठल्या वाटान काजींनी धावलो. मोग आमची शर्यत सुरु जाली. कुत्रो कबुतराला धरनी धावसे अणि में कुत्रे पाठल्या काठी घेवनी धावासां. धावता धावता में एक दोनदा पडलो. पानशीचे काटे लागले. हात, पाय सोल्नी घेतले. शिवाय ढोपर कोपर धोडावनी घेतले. असा करनीं खूप धावलेवर कुत्रो दृष्टीला पडलो. पण लागी पावलेवर माजेवरच गुरगुरो लागलो. तेला खूप दिवसांनी मेजवानी मिळलेली. शेवटी जिबली चाटीत माजे पुढेंत्थीन नायसो जालो.

## .... कबुतरां

एका कबुतराचे हे हाल बघ्घी, दूसरा कबुतर कारा नाहीच जाला. मोग कय्ळां, कि तां जोडपां सला. कुत्रेन न्हेलेलां कबुतर बहुतेक मादी कबुतर सलां. तेला लागोनी नर कबुतर विरहान नायसा जाला. मादी कबुतराचे हाल बघ्घी नर कबुतर पोळोनी गेलो. थोडे वेळानं कुत्रो तोंड पुशीत, पुशीत आयलो. अणि माजेकडा न बघता दुर जावनी बेसलो. लक्ष मात्र पिंजरे कडा सला.

माला आक्का, वैनीन खूप शाब्दिक मार दिलोन. एक तर तुला जां काम करे हवां तां करेचां नाय अणि नाकां जाल्ली कामां मात्र करसय. जा काम तुला खबर नाय ता करे जासय. वर्थीन धोपर, कोपर फोडणी घेतलेस. एतां दादा आयलेवर बघ तुला कितां करसे तो.

माला कापरां फुटलां. संध्याकाळ हत आयली. में लोक्कोर लोक्कोर  धोपाराना, कोपराना ओखद लायला. संध्याकाळा बस येव्वेची वेळ लागी पावली. बशीवर येणारे लोक सात ते सव्वासात पर्यंत घरा पावत. में भयान सातानांच थोडां आटवल जेय्लो अणि लोक्कर निदवनीं सोडलां. म्हणजे निदवेचा नाटक रंगयला.

पिंजरो भायल्या पडव्यात ओंब्कळायलेलो सत सलो. दादा घरा पावता क्षणीच तेची नदर पिंजरेवर गेली. रिकामो पिंजरो बघ्घी तेला कितांतरी भानगड जाली से हेचो अंदाज आयलो. थोडे वेळान चहा पाणी हतकच वैनी, अक्का न घडलेली सगळी काणी सांगलीन. दादा बोयलो “म्हणीच तेनी निदेचा सोंग घेतलां से, माला कळत नाय का कितां. एरवी णवू वरा जाली तरी कइच निदवत नाय.“

में जागोच सलो. निद केंची येणार? साद घाय्लोन जाले जाब देवेची नाय, में ठरव्नी थेयलेला. पण दुसरे दिवसा प्रकरण शांत जाला. कारण माला तिडकोव्नीं किदांच विचारला नाय. तेचो कितां उपयोगय नतलो. में हव्नी में कितां कर्तुक केला तां तेला सगळा सांगला. तेड्लापाश्णी आमचेकडा पिंजरेतली सुकणीं (पक्षी) हाडेचे बंद जाले, होच पयलो अणि शेवटचो पिंजरो.

श्री. सुभाष जोशी
पोर्वरी गोवा

# कलईची आयदणां

आजतागायत घरांघरांत दिसणारो बदल म्हणजे , 'स्टील अणि प्लास्टिक' हेंचो मोठे प्रमाणात वापर हतानां नजरांत येसे. हेची कारणां अनेक सत. एक म्हण्जे वजनाला हळू, थोडेसे श्रमान घासी पुस्री चकचकीत हसत तसांच किंमतीचो विचार केलो जाले परवडणारी. म्हणीच काय कितां तांब्या पितळीची आयदणां मोडीत काढनीं हेंचे जागेवर हो पत्रो विराजमान जालेलो दिस्से. सांगेचा तात्पर्य हे कि आपली संस्कृती अणि मुळतः आपले जुन्या गोष्टिपाष्णी आमी दूर जात सों, हे मात खरां. काळानुसार माणसाला बदलेची मुबा सली तरी 'जुनां तां सोनां' हे विसरोनीं उपयोग नाय.

आमचेकडां खूपसे कला कुसर करणारे कारागीर सलें अणि सत. जसे बेळाच्यो वस्तू करपी, आयदणांना कलय काढपी, माडावर चडोनी नारळ काडपी पाडेली, मेस्त, धवड असे बरेच सत.

काळानुसार ही सगळी कला लुप्त हत से. ल्हान सताना आमचे गावात आयदणांना कलय काढपी येत सलो. कलय करप ही एक कसब अणी कला से. पयलीं लोकात्यां पितळ, तांबां अणि चांदीची आयदणां सत सली. ऐतां सारखी स्टीलाची नतली. ही पितळची , तांबेची आयदणां एक दीड वर्खात्थीन एकदा कलय काढनीं घेव्वेची प्रथा सली, न्हुय अजूनय बी से. जी आरोग्याला फायदेशीर से, कारण कथिल/tin Immunity booster, thyroid अणि थंडीखोकले वर काम कर्सत तसांच नवसागर/अमोनियम क्लोराईड हे धातू बी शरीराला फायदेशीर ससत.

जाले कलय काढपी जमात दारादारात भोवोनी आपलो उदरनिर्वाह /पोट भरेची कामां करीत सले. तेंचे बरोबर कोळसे, वारो मारेचो पंप, कथिल, नवसागर अणि जाड कपडे सत सले. कलय काढेचां काम तसां किचमिणां अणी जिकिरीचां. म्हणी तेला जाणकारच माणूस लागसे.

ल्हांन सताना आई अशी आयदणां काड्नी कडाला थेवी अणि कलय काढणारेची वाट बघीत न्हेत सली, जेड्ला “कलई घ्या कलई” असां आयको येवं लागलां कि आमी तेंना बलाव्नी हाडीत सलों. तो आयलो कि काम करे सुरवात करीत सलों. आमी कौतुकान बघीत सलों कि तो कसो आधी कोळसें थेव्नी विस्तव पेटयसे. सुरवातीला धुकोट हय, मोग आग पेटवे म्हणी भातेन वारो घालीं. कोळसे बेशबरे पेटले काय गाव्यात धरनीं एक एक करनीं आयदणां तापोवनी तेत कथिल फिरवोनी, नवसागर घाली मोग जाड सुडको घेवनीं सगळी कडा सारखा पुस्री निवळ करनीं एकदम चकचकीत करी. अणि वरती थंड पाणी ओती कि चर्र असो आवाज येत सलो, तो आवाज आज बी कानात जसेचो तसो आयकों येसे. मोग आयदणां सुकत थेवी आई मोग सगळीं आयदणां एकठाय करनी, निव्वळ करनीं घरात वापरे घेय. एकूण एक तपलां, पेले, तामयो, कायलाथे, तोप, पळी, परात अणी ताटां कलय लाव्नी चकचकीत जालेली आयदणां बघ्री आमला खूप मजा येत सली. अणी नवल बी दिसत सलां

ऐतां हे सगळां नष्ट जाला से. कारण एतां तांबे - पितळची आयदणांच बगे गावत नाय. तेंची जागा एतां स्टिल अणि नोन स्टिक आयदणांनी घेतली से. जसो काळ बदलसे तसो बदल, हे क्रम प्राप्त से. जरी हें खरां सलां, तरी हे स्टील अणि प्लास्टिक आयदणांचे वापरामुळां माणसांचा आयुष्यमानही खूपच कमी कमी हत चाल्ला से हेचो कारोतरी विचार हव्वे हवो.

शितल रानडे, लंडन.

# गुड्डयो



"अरे, नळभ काळा जालां से, वारोय सुटलो से, स्लेबावर मिरसांगो सुकत घायल्यो सत त्यो घेवनीं ये म्हणी मगातपाष्णी दोनदा सांगितला, अजुनीं हाडल्योसच नाय रे ? आयके येसे का नाय तुला का कानात गुड्यो घायल्यो सय?" तेचां कांयच उत्तर आयलां नाय. म्हणी थोडे वेळान सागराची आई भायेर आयली. बघसे जाले, सागर हेगडा तेगडा बघीत सुशेगाद सोपेवर बेसलेलो. तेला आयके आयला नाय हे आईचे केड्लाच लक्षात आयलेला. ती मात्शी पुढां गेली अणि बोड्येला परतो साद घायलोन. तेणीन मात्सां पाठल्यां वळोनी बघितलान अणि परत तसोच बेसोनी ऱ्हेलो. धपधप पाय हापटीत आई तेचे लागी आयली अणि वायरीसकट कानातल्यो गुड्डयो भायेर काढल्योन. "अरे, इतको वेळ अश्यो त्यो गुड्डयो घालनीं बेसलोस जाले कान फूटनार रे एक दिवस, तुला मगापाश्णी में एक काम सांगितलेला तां केलासच नाय, थेंबे पडो लागले पावसाचे म्हणी मेच वरती जावनी मिरसांगो हाडल्यो". आई तिडकीन, 'बोंबल्याचे देठापाश्णी' तेला बोलत सली.

असे, सागर अणि तेंच्यो आई हाली खूप घरानी बघे मिळसत. आदी मोबाईल आयले, थोडे दिवसांनी तेचे बरोबर ह्यो कानात घालेच्यो गुड्यो गावो लागल्यो. आपण आपले आवडीचा कितांय मोबायलात आयके म्हणी लायला जाले बाकीचेंना तेचो त्रास हयवे नाकां अणि आपले कडाला हणारे आवाजांचो, बोलणारेंचो त्रास न हतां, अगदी शब्दानशब्द अणि गाणां सलां जाले तेतलो तबलो, नाय जाले एखादां बारीक वाजणारां वाद्य सुद्धा आयके गावसे म्हणी ही इयरफोन ची सोय आयली. तेना वाईट म्हणेचो हो सूर नाय पण जसो अति मोबाईल वापराचो वाईट परिणाम दिसो लागलो तसोच हे गुड्यानीय आपले परिणाम दाखवे चालू केले सत. कानाचे,आजार होव लागले सत ती एक काळजी वेगळीच.

शाळांत, घरात विद्यार्थ्यांना संस्कार दिले जासत की, बशीन जाताना आपलेला जागा गावली अणि तितकेत कोणय आजी/आजोबा, ल्हांन भुर्गेला घेवनी बाईल माणूस गाड्यात चढली जाले आपण उठोनीं तेनां जागा देवेची. पण हाली कॉलेजचे अणि कयतरी शाळांतले विद्यार्थ्यांची एक सवय दिस्से, जागा गावली काय बेसेचां, बेगातथिन मोबाईल अणि वायर काढेची अणि कानात गुड्यो घालनी आयकत, किताय बघीत प्रवास करेचो. आपलो स्टॉप आयलो काय हातात फोन अणि कानात गुड्डयो घालनीच उतरेचां. सीटावर कडाला बेसलेले माणसान कितां विचारला झाले एकाच कानातली गुड्डी काढेची अणि तेचो प्रश्न आ..?? म्हणी परत आयकोनी घेवनीं तेला उत्तर देवेचां, परत कानात घालेची.

# गुड्डयो

ते वायरीची कटकट नाकां म्हणी 'ब्लुटूथ' म्हणी आयलां. तां कानाला के लायलेला ससे तां कळतच नाय. आधी आमी रस्तेवरथीन एकटोच बडबडत जाणारे माणसाला पिसो म्हणत सलों. तेला जाताना 'ए पिश्या', म्हटलां जाले तो गुंडे घेवनी आमचे पाठल्या लागे. एतां तसले बडबडत जाणारे माणसाला कडान जाताना चार गाळी घायल्यो तरी कांयच फरक पडत नाय, असां दिससे. गाडी चालयणारे बी तसेच. कानाला तां मीशीन, हेल्मेट,तेची ती पुढली काच घालनी एकदा बेसलो गाड्यावर, काय कानात वारो भरले सारखे गाडी चालवे सुरू. गाड्याचो आरसो सलो, तेचेकडा लक्ष सलां झाले पाठल्या येणारा वाहन कळणार, नाय जाले तो मोठ्यांनी हॉर्न करीत जासे आपलो पुढां. तां गाणा किंवा कितां तां आयकेची गुंगी अशी वाईट ससे की, डावीकडा, उजवीकडा वळताना गाड्याचो दिशा दाखवेचो दिवो (indicator) लावेचीय आठवण उरत नाय. काल एक कॉलेजची चेड तो दिवो, हात न दाखयता एकदमच उजवे फाटेला जायवे वळली, पाठल्या जाणारे बोड्येला ब्रेक लावीस्तोवर पुरे जाला, जेमतेम टक्कर हयवेची उर्ली. "अगे बाये, indicator तरी दाखय वळेचां जाले", म्हणी नेटान तापयलीन. त्याचे कानात सले गुड्डे, ती, 'कितां जालांच नाय, असे भावार्थान गेली आपली पुढां.

ल्हांननपणात गालगुंडा, थंडी, ताप आयलो, नाय जाले कान दुखत सयेल जाले वारेपाश्णी जपे म्हणी कापसाच्यो गुड्डयो घालणारी आमी एतां कोणाचे आवाजाचो त्रास हयवे नाकां म्हणी ह्यो यंत्रगुड्डयो घालनीं मनालाच जास्ती जपो (?) लागलों सां का कितां, असो प्रश्न मनात येसे.

ह्यो गुड्डयो नवीन आयल्यो तेड्ला तेची अपुरवाय वेगळीच. घरात एक, दोनच, तेय बी साधे मोबाईल फोन. तेत भरनीं थेयलेली तितकीच गाणी आइकताना लाग्गी बेसोनीं, एक गुड्डी एकाचे कानात दुसरी गुड्डी दुसरेचे कानात घालनी आयकत सलो. अर्धे तासाचे प्रवासात हे इयरफोन घेवनीं गेलो जाले तेची गुटाळी सोडवेच दोन मिनिटां जात. तेचे पुढां हवां तां गाणां सोदेचा काम. एकेकदा हेगडाथिन वायर चुकोनी ओढली गेली काय तेगडाची गुड्डी 'कोण रे तो'? म्हणत काना भायेर येसे. एन्ड्रॉईड मोबाईलवर बघताना कयतरी गुड्डयो कानात अणि विडिओ आयकेच येत नाय, मोग लक्षात येत सला ती पिन फोनला कोण जोडणार? म्हणी आपलीच फसगत बघनीं हसे येय. लॉकडाऊन सलां तेवेळा कयतरीच कसलेतरी कारणान झूम मीटिंग हत सल्यो. तेड्ला हे 'ब्लुटूथ' प्रकार नवीनच. तां घालनी बोलेचां कसां तां शिके गावला हे खरां पण तां सारखा चालेल नी, ती बोलसत तां आयके येल नी, तेचा चार्जिंग सोपेचा नाय नी आपली फकाणां हयवेची नाय नी, असा कितां कितां मनात येत सलां. पण नवीन शिके गावला , हो तेतलो आनंद. बाकी एक बरा पडसे, भाज्याला, रांधपाला कोणी नावा थेयली..,ओगीच पटेचे नाय असे एकसारखे / निसंग उपदेश केले..., हू..श..! आमचे कानात गुड्डे. आमला कायएक आयके आयलां नाय. नाय म्हटलां तरी मनाला थंडाय गावसे हेय तितकाच खरां.

बाकी एतांची सगळी पिढी चुकिचो वापर करसे असा म्हणेचा नाय. पण इयरफोन, इयरबड्स, ब्लूटूथ ही शेवटी यंत्राच. तेंचे बरोबर आपणाला चालेवां लागणार हेय खरां से तरी सुद्धा तां कितकां वापरेचां हेचां ध्यान थेवनी, अती वापर हत नाय नी? हे समजोनी घेवनीं पुढां जायवेचां हेतच शाणपण से. हय का नाय?

भावना दातार, बेळगुंदी, बेळगाव

# वेळ



वेळ म्हटला की घड्याळ दोळे पुढां आयलां. आज आधुनिक जगात घड्याळां खूप तराची आयली सत पण वेळ एक. आधीचे काळांत बरण्यात रेंव भरनीं वेळाचो अंदाज घेत. काहीजण भाहेरचां वातावरण बघनीं वेळ सांगे तरबेज. जगात वेळ प्रत्येक देशांत वेगवेगळी ससे. दोन तीन तास, पाठी पुढाचो फरक. वेळाला महत्व प्रत्येकजण आपापले नुसार देसत. काहीजण वेळाचे बाबतीत परफेक्ट म्हणे हरकत नाय.

एका काळात, घड्याळ बांधपी तो श्रीमंत. हातात भरगच्च मोठे डायलचा घड्याळ. आजचे युगात वेगवेगळे तराची घड्याळा दुकानांनी मिळसत किंवा एतां ऑनलाईन पध्दतीन खरेदीला प्राधान्य देसत. घड्याळाची  जागा, अतशा काहीशी मोबाईलान घेतली म्हणे हरकत नाय. कितां जालां तरी वेळाचा महत्व हे पाळे हवाच.

शैक्षणिक संस्थांनी, सरकार दरबारात किंवा खाजगी कंपन्यांनी वेळ खूप पाळसत. एकदा एकटेला मुलाखतीला सकाळी णऊ वरानां बलायलो सलो. हो सकाळी पावणे णवाना हजर जालो. तेचे पाठोपाठ उरलेले उमेदवार आयले. हेचो दुसरो नंबर सलो. मुलाखत लोक्कोर हनांर असो तेचो अंदाज. अकरा जाली..दुपार जाली शेवटी दोघजण सले तेंच्यो मुलाखती घेतल्यो. हो घे~ बेजार जालो. पण संस्कार सलेलेन संयम राखलो. काही उलट सुलट उत्त्रा दिली नाय. शेवटी पाचाना हेला बलायलो. कॅबिनात गेलो. विचारणां जालेवर वेळाचां महत्व सांगितला पण आपण पाशियस काढलां म्हणी सांगितला. मुळात खूप हुशार सलेमुळां तेला कामासाठी नेमलो/निवडलो.

थोडेनां वेळाचां महत्व खबर नस्से. आठाला बलायले सत नी. तेची आठ म्हणजे दाहा गृहीत धरेची. केंचे कार्यक्रमांना, लग्नाला, वाढदिवसाला आयलेले सोयरे आपलो अमूल्य असो वेळ खर्च करनीं येसत.

गोवेत पायलट प्रस्त खूप. तेचेवर काहीजणांचो संसार चालसे. सत्तरीत काही जुने पायलट शब्दाचे पक्के. शाबलो, खान, लाड अशी तेंची नावा. सांगितलेले वेळा आधी पाच मिनिटा हजर. काहीजण दाहानां सांगितलां से नी. साडे दहा पर्यंत गेलो कि जालां. तितके वेळांत तो अणि एक भाडा मारसे. मोग कितां जेनी बलायलोन तेचे दिवसभराचे योजनांचोय बी चुराडो. तो वेळात हजर न्हेणारो पण हेंचे मुळा तेचां सगळां बिघडसे.

# .. वेळ

एक दिग्दर्शक नाटकाच्यो तालमी घेव्वे बारा किलोमिटर वेल्यान येय. सुरुवातीला कलाकार सद्दांसारखे येंव लागले. काय दिवस गेलेवर दिग्दर्शक बेजार जालो कारण कोणच वेळात येत नतले. येताना किंवा देवळा भाहेर सुद्धा हेंच्यो गजाली ताण रंगत. हेंचे सगळेंचे नखरे तेनी जाणले. तो वेळाचो पक्को. सात म्हणजे साताना हजर. जो वेळ पाळत नाय तो आयुष्यात कितांच करू शकत नाय. एक दिवस हेनी सात ऐवजी आठाना सगळेना देवळात तालमीला बलायले. निदान आज तरी वेळात येतील ही आशा. पण रोजचे प्रमाण 'येरे माजे मागल्या.' ते दिवसा अणिक पंधरा मिनिटा उशीर केलो. हो बरोच बेजारलो सगळेंना सक्त ताकीत दिली. में आज घरा चाल्लो. तुमी वेळ पाळणार जाले नाटक किंवा केंची गोष्ट यशस्वी हनांर. तो काय जास्त बोललो नाय. आपण उद्या पर्वा तालीम घेव्वेचो नाय म्हणी सांगितला. तुम्ही इच्छुक सा जाले माला पर्वा रात्री सांगा. मोग में विचार करींन असा म्हटलां अणि सरळ बाहेर पडलो. पण तेचा पडलेला तोंड, राग बघनी सगळे भ्याले. आपापसात कुचबुज सुरू जाली. एकमेकांवर धकलू लागले. शेवटी सगळेंनी वेळांत येव्वेचां थरला अणि नाटक एक नंबर जाला

शिम्पी, म्हाले हे वेळाचे सहजा पक्के नस्सत. म्हालो मुंज कार्याला हमखास उशीर करसे. मुहूर्त लागी पावलो की यजमानाचो प्रेशर वाढलो. मग तो कोणाला बघे धाडसे. मग वाटावर म्हालेचा दर्शन हसे. वेळ की लायलो विचारलेवर 'उठोक जावना' किंवा उत्तरा तयार ससत. आयलो की चहापाणी खाणं. उपरात वाखर घासणेत वेळ काढप. मोग भट अणि यजमान बेगीन कर म्हणी पाठल्यान लागसत. तो पर्यंत यजमानची पाचावर धारण. शेवटी मातृभोजन हसे मुहूर्त मिळसे ही गोष्ट निराळी. केड्लाय मोग चर्चा हसे. "ते वामन म्हालेला सांगो नाका हा!" माजे बोडयेच्या मुंजी वेळा धांदल केलीन. वेळात नाय आयलो. शेजारी सांगसे, में बिहारी म्हालेला म्हटला से. ते 'आता हुं'! म्हणोनी वेळात तरी येसत. काहीवेळा 'वेळाला' लागोनीं इतकी धांदल हसे सांगता सोय नाय.

टेलर जाले विचारेचा नाय. आज दिता फाल्या दिता म्हण्टा म्हण्टा आठ पंधरा दिवसांनी शिवलेले कपडे देसे. काहीवेळा लग्नाला कपडे वेळात लागसत. शाळा सुरू जालेवर भूर्गेना महिने उपरात मिळसत. मग तो मास्तरा कड्ल्या  वेळ प्रसंगी बोलणी खासे. मार घेसे. किंवा घरा जाववेची पाळी ऐसे.

सरकार दरबारी राजकीय कार्यक्रम विचारे नाकां. हे लोक केड्लाच वेळाला महत्व देत नाय. मुख्यमंत्री मंत्री म्हटला की तेना कामां हजार. आठवणी खूप थेव्वे हव्यो सल्यो, तरी वेळाचे बाबतीत पाठीपुढा हसे. मग कार्यकर्ते किंवा एखादे शाळाचे स्नेहसंमेलन कार्यक्रमाला हमखास तासभर उशीर. मग भुर्गी पालक बेजार हसत. भूर्गेना नीज येव लागसे. एता अणि लोकसभा निवडणुको आयल्यो. मोठमोठे सभाना तर तीन तीन तास हमखास उशीर. मग जनता बेजारसे. भाडेचे लोक वेगळ्या कारणानं बेजारत नाय. तेला कारण विशेष म्हणे हरकत नाय.

वेळाची एठा वारव्या वेगळे प्रकारे मांडसा. वेळ म्हणजे फक्त घड्याळ असां हत नाय. एखादे वाईट प्रसंगात्थीन माणूस दगावलो की आमी म्हणसो वेळ काळ एक जालो. तेचो जीव वाचलो की काळ आयलेलो पण वेळ बरी सली तेची. पाच मिनिटा उशिरा बाहेर सरलेलो जाले हे घडणारा टळणार सला. हो एक आमचेत गैरसमज. ज्यो गजाली घडेच्यो ससत त्यो घडसत. बरे अणि वाईट घडणारे प्रसंगाना कोण आडोव शकत नाय हे मात्र खरां. वेळ काळ साथ देत नसेल जाले शेवटी आमी नशिबावर धुकलसों.

# .. वेळ

घराशी कामावर येणारी कांबेरी वेळात आयली जाले नशीब. तेंची जाय्वेची वेळ थरलेली ससे. सकाळी हे येणार काय नाय हे ताटकळत बघीत ऱ्हेव्वे हंवा. एखादे वेळा "माका आयज येंवक फावचे ना हा म्हणी निरोप!" मात्र नेमकां जे दिवस गरज ससे ते दिवसा घोळ घायलोनच म्हणी समजेचा. आजचे काळात कोण तसो कामाला नाय येत ही वेगळी गजाल. कारण म्हणजे लज दिससे. दुसरी गजाल आमचे पेक्षा आज तो समाज स्टेटस दृष्टीन वरती पावलो म्हणे हरकत नाय.

वेळावर विश्वास अवलंबून से असा माजां मत. में एकदा 'स्वागत समारंभ' व्हिडिओ शुट करनीं, दुसरे दिवसा 'सांगे' (गावाचा नाव) सकाळी साताना पाव्वे हवा सलां. पहाटे दोनानां येवनी निदवलो. जेम तेम अडीच वरां (तास) निद घेतली. सकाळचां आवरोनी वाळपई सांगे प्रवास केलो. वेळाचा भान थेयला. साताला दाहा मिनिटा सताना तेचे दारावर फोटोग्राफीला हजर. में वेळात पावेल ही खात्री तेनां नतली. हळद कार्यक्रम तेंचे वेळाप्रमाण सात, मात्र जालो अक्राला. तो पर्यंत में मान डोलावित गाड्यात निद काडे यत्न करी. पण हुस्केन निदाला पड्ली पाड. माजी तकली फिरली. सराला फोन लायलो. "तुजे वेळाचे विश्वासावर में एक हजार रुपयेची यजमानाकडा पैज मारली से." असा सरांन म्हटलां. वेळात सुरू जाला नाय म्हणी आयलेली तिडक दूर पावली. माजे वेळावर विश्वास थेवनीं मारलेली पैज में सार्थकी लायली हे एक मोठा बळ देणारा समाधान गावला.

माणसाची वेळ वाईट सली की आमी म्हणसो तेचा बेडलक. (दुर्दैव). वेळ बरी सली की तेचा लक (नशीब) बरा. माजे वारव्याप्रमाण "वेळ जो पाळसे, तेच माणसाचे जीवनाचा सार्थक हसे!" वेळावर खूपशो गजाली अवलंबूनी ससत. वेळ बरे मार्गाला वाप्रेचो हे एक लक्षात थेव्वे हंवा. वेळ वाईट गजालीना वापरलो जाले तेचो फायदो शून्य. मग ता कसलाय वाईट व्यसन सो. आपलो संसार बघनीं सामाजिक भान थेव्वे हवा. वेळ शक्यतो आध्यामिक नाम जपात घालवप योग्य. नाम जप बेसनीं करे हवो असा नाय. आपला मन भावना शुद्ध हव्यो. आजचे तरुण पिढीला माजो एक सल्लो गेलेली वेळ परत नाय येत. भरपूर शिका. उच्च पदावर पावा. घरातले माणसांचो आदर राखा. जीवनात बरा योग्य समाजाला उपयोग होयेल असा काम करा. तुमचा कर्तुत्व मोठेपणा न मिरयता समाजासाठी वापरा. तुमचे आदर्शावर भावी पिढी आपणच घडेल हे मात्र खरा.

राजू बर्वे
सातोडे, सत्तरी, गोवा

# बदलापूर गावाची थोडकेत माहिती



बदलापूर हे कसबा गाव से. तां चौआन महालात येसे . कल्याण हो प्रांत अणि राजमाचो तालुको सलो. गावाचां वर्णन 'कसाबे बदलापूर टर्फ चोन प्रांत. कल्याण तालुका राजमाची' असां करेची सरकारी प्रशासनाची प्रथा सली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे काळांत बदलापूर - सूरत मार्गान कोकण अणि गुजरात दरम्येन रहदाऱ्याचो रस्तो सलो. उत्तम प्रजातींचे घोडेसाठी हे शहर प्रसिद्ध सलां. कोकण प्रदेशातल्या कठिण लढाईसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे / योद्धे एठा घोडेंची अदलाबदल करीत. हेवर्थीन हे शहराला 'बदलापूर' हे नावान ओळखो लागले.

बदलापूर हे महाराष्ट्रातलां एक निसर्गसौदर्यान नटलेलां शहर से. ठाणे जिल्हेतले  'उल्हास' नयचे काठावर वसलेलां हे शहर 'कुळगा़व - बदलापूर' हे नावान सुध्दा ओळखला जासे.

मुंबई शहराला हे शहर उपनगरीय रेल्वेमार्गान जोडलेलां से. हे गावातली माला खबर सलेली प्राचीन / जुनी देवळां १) कात्रप गावदेवी, कुळगांव गावदेवी, शिरगाव गावदेवी, खरवई गावदेवी. ह्या देवी देवतांचो, चैत्र म्हयनेत उत्सव साजरा केलो जासे. तेवेळा गावदेवींची पालखी देवळापाश्णी अख्खै गावात वाजत गाजत भोवडायसत.

बदलापूर गाव बदलापूर रेल्वे स्थानकापाश्णी २:३० ते ३ कि.मी अंतरावर से. त्याहां इ. स. १६७० सालांत छत्रपती शिवाजी महाराजांचे काळातलां महागणपतीचा देऊळ, कुळगांव गांधी चौक एठा हनुमानराम देऊळ, दत्ताचा देऊळ, स्टेशन पाडा कुळगांव बदलापूर पूर्व अशी प्राचीन देवळां सत. स्टेशन पाड्यात ५७ वर्षांपाश्णी माघी गणेशोत्सव धा दिवस साजरो केलो जासे, तेड्ला जात्रा / कालो ससे. बदलापूराचे आरती परती मुळगाव खंडोबाचा अणि कोंडेश्वराचां देऊळ तसांच बारवी अणि चिखलोली धरण/बंधारे सत. एठा दूरत्थीन लोक येसत. एतां ही सगळी, हे भागातली पर्यटन स्थळां जाली सत.

माला खबर सलेल्या माहितीचे आधारान में माजे गावाचो अल्प परिचय करनीं देव्वेचो प्रयत्न केलो से. तर असो हो माजो प्रसिद्ध गाव बदलापूर.

सौ. वर्षा केळकर, बदलापूर.

# नातवंडा

नातवंडा म्हणजे नक्की कितां ससे ?
आजी-आबा म्हणत परत येव्नी मिठी मारसे तेड्ला परत एकदा आई - बाबा जालेचां अंतर्गत
समाधान देसत, ती ससत नातवंडा!

'ग्रॅंड पॅरन्ट्स डे' ला जेंचेमुळां परत एकदा शाळांत प्रवेश मिळसे,
'नामांकित व्यक्ती' म्हणीं मिरवे गावसे, ती ससत नातवंडा!

कितकेंय वेळा एकच गोष्ट तेंचेनी दाखयली,
तरीय प्रत्येक वेळां जेचां अप्रूप दिस्सेती ससत नातवंडा!

धकाधकीचे आयुष्यांत आपले भुर्गेंबरोबर
वेळ घालवे आयलो नाय
हि खंत फास्नी उडयणांरो एक खोडरब्बर (Eraser) ती ससत नातवंडा!

"नाकां गो तापंव त्याला ती/तो ल्हांन से“
असां ज्यांचेसाठी सद्दानीं म्हटलां जासे ती ससत नातवंडा!

गर्द्यातसुद्धा जेंचे दोळे आपलेला शोधसत,
हेची मनांला जाणीव करनीं जी देसत ती ससत नातवंडा!

कोवीडात सुद्धा आठवडेतलो प्रत्येक क्षण मनोरंजन करणारी वाहिनी
ती ससत नातवंडा!

दमलो रे, थकलो रे असां थोडांसुद्धा मनात न येतां,
साखराचेला (मधुमेही) सुद्धा उपयोगी असां गोड गोड बळ देनांरी
ती ससत नातवंडा!

आपले भुर्गेंपणांचा प्रतिबिंब दाखयणांरा साधन
ती ससत नातवंडा!

पुरे ! देवा, “एतां कायच नाकां आयुष्यात, फक्त 'तुजां' गोड गोड हसप अणि पापी हवी !"
असां जेंचेसाठी दिस्से
ती ससत नातवंडा!

सौ. मिनल आगाशे, पुणे
चित्पावनी अनुवाद : सौ. आरती मोने, गोवा



# बाप नावाचा बेट..आमचो भाऊ

गरज ही शोधांची जननी म्हटलां जासे. आमचे खेडेगावात एखादी नड आयली जाले तालुकेचे ठिकाणी जाणां हय. पण तां ७ कि. मी. दूर. तेंत सोयीच्यो गाडयो, वाहना नतली. गेलो जाले सगळो दिवस मोडे तेंत. मोग घरचो कारभार कसो हयवेचो? घरांत्थीनच ही नड भागवेची पडे. भाऊ खूप हिकमती. नवनवे प्रयोग करनीं बघित. जमला जाले उपयोगाला येय, नाय जाले पाड तां म्हणी उडोवनी दिला तरी चाले. तसोही तेचो किता उपयोग हनांर सलो?

एकदा स्टीलचे पळ्याचो दांडो मोडलो. तो कितां जोडे येनांर परत! भाऊंनी तेला धोडावनीं धोडावनीं पातळ केलो. सरळ पट्टी कशी केली अणि तेला एका कडान धारेचे गुंडेवर धार काढली. खूप वेळ लागलो मात. स्टील तां, सहज थोडांच हनांर? बरी धार आयले उपरांत तेला हात धरे लाकडी मूठ करनीं जोडली अणि घे सूरी म्हणी वापरे दिली. कित्येक वर्षा ती सूरी कांदे, बटाटे कात्रेला घेत सलो आमी. एक दोन आलिमिनाच्यो पातेल्यो बुडाला भोकुरे पडलेल्यो. तेंचे लांब दांड्याचे झारे केले एक सारखे भोकुरे मारनीं. घसघशीत बरे. लग्न मुंजी कार्यात बुंदी तळे तेंचो वापर हय. तशीच पसरट आयदणाची चाळणय केलेली. गडख्यो वेगवेगळे ऊंच्याच्यो वेगवेगळे कारणासाठी केलेल्यो.

तेंचे कडा कितांय करे देवेचा भाऊ करनीं बघित. करनीं बघे कितां पैसे पडत नाय अणि जालांच तर वापरे तरी मिळेल असा तेंचा म्हण्णां. काटकसरी खूप. पाट्या वेल्ली पेन्सिल तेंचे अंदाजा प्रमाण पुरोवनी वापरेची सक्ती, चिमट्यात मावेनासो जालेलो कुडको दाखयले वरच दुसरी बोट भरी पेन्सिल मिळे. अशोकाचा पुस्तक वाचताना मालाय बी भाऊंचे उद्योग यवजलेले.

## बाप नावाचा बेट..आमचो भाऊ

पोवल्याचे दोणे, इतके आखीव रेखीव की सामखे बघित व्हेव्वेचे. करताना सुध्दा बघित व्हेवां असे दोणे बांधीत. दोन्ही कडो एक सारख्यो. मोजपट्टी लावनी बघेवि असे. साधी पेरां कापनी देताना सुध्दा व्यवस्थित. अजूनही यवजसे. तेंचे बरोबर बेडे कुडावे गेलेवर, पाना काढे गेलेवर पाखानी खाल्लेले जांम, पेरां बरी कातरुनी देय. केळीची पाना जेवणासाठी लागत ती सुद्धा एक्का सारखी काढीत, ती बी न पिंजता. आमला सोपां हाड्णी देत सले पण पाना काडतानां खूप लक्ष देवनीं, जपोनी काढीत सलों. प्रत्येक गोष्टीचो हिशेब लागे तेना. कानदोळो करे गावत नतलो.

#स्वयंपाकी
भाऊउत्तम स्वयंपाकी सले भाऊ. गावात मोठी कार्या सली की भाऊ श्रीराम दादा (अणि बाकीचे पण सत सले मद्त्याला) मुख्य रांधपी (आचारी). अचूक अंदाज अणि जिन्नस रुचकर हय. रांधप कमी अधिक पडसे असां दिसलां कि रोकडोच तेवर तोडगो काढी. आमची आई लोक्कोर गेली, तरी भाऊंनी चेडीनां वाढवेची जबाबदारी नीट पार पाडलीन. दिले घरा नीट नांदे हव्यो म्हणी शिस्त अणि रांधप वाढप शिकयला. 'अगो करनीं बघेचां मोग जमसे' म्हणत. लोणची , पापड अणि इतर खाणे पिणेचे जिन्नस, मोरांबो, मूरावळे, चणेचां सांबारां, हरवे केळेंचा पंचामृत, कारेतां, उड्डु मेथी, अळमी, हरवे मसालेचो (कच्चे मसाले) फुलावर (फुलकोबी), बटाट, टमांट घाल्नी रस्सो, केळेंचा मेल्क म्हणजे खास गोड पदार्थ हाल्वो. सगळे प्रकारचो मसालो असां सगळांच तेनां खबर.

गोवा मुक्तीचे स्वातंत्र्य सेनानी म्हणी तुरुंगात सताना बहुतेक हें सगळां शिकले सतील असां दिससे.प्रत्येक गोष्ट ते चिकाटी अणि बारीक लक्ष घालनीं करीत. नीटनेटकां पण कमालीची शिस्त हेंत भाऊ पक्के. केंचीय वस्तू हेग्डा तेग्डा उडयली असां अजिबात खपत नतला. देवांची पूजा सुद्धा देखणी, बघताक्षणी नदर म्हणी ढळेची नाय. सद्दानीं तिधसाना मारुतीचे देवळात दिवो लावनीं ध्यान करेंचा हो नित्य नेम तेंचो कईच चुकलो नाय.

पुढां पुढां तेंचो दमेचो त्रास वाढलो, अणि खोकले मूळां कष्टाची कामां करेचा बंद केला. तरी सल्लो मात्र देत सले कोणा गरजूला.

#चप्पल दुरुस्ती
भाऊ चप्पल दुरुस्ती पण करीत सले. तेची एक मजेशीर गजाल आमचे ताईचे लग्नातली .आदले दिवसा बेळगावात्थीन वऱ्हाड आयला अणी ताईच्या भावी सासूबाईंचा जुताच तुटला. एता जाली का पंचाईत. आमचे खेडेत केंची दुकानां?

जुता नाय म्हणजे सगळाच अवघड जाला. शहरात्थीन आयलेले लोकांना जुतेशिवाय चालणा तसां कठीणच. मोग भाऊंचे मित्र नाना (जे बेळगावला प्रोफेसर सत, एता रिटायर्ड) तेंचेनी क्षणाचोही विलंब न लायता "घाबरू नका पांड्या (भाऊ) देईल दुरुस्त करून" असा तेनां सांगितला. तेनां अवघडच जाला. होंकलाचे बापायला चप्पल शिवे देवेची म्हणजे.... पण नाईलाज सलो अणि भाऊंनी पण आढे वेढे न घेता आपली हत्यारा काढनीं तेंचा जुता दुरुस्त करनी दिलान. त्यो विस्मयचकित जाल्यो. नंतर कित्येक दिवस हो किस्सो खूप जणांना ती भाऊंचा कौतुक म्हणी सांगे.

# बाप नावाचा बेट..आमचो भाऊ

#मूर्तीकार भाऊ
भाऊ गणपती मूर्ती करीत सले. तसे आमचे गावातले चार पाच जण करीत. आमचे अणि आडाकुशीचे गावातले बरेच घरांनी आमचेत्याथिन न्हेलेल्यो गणेश मूर्त्यो पूजल्यो जात सल्यो. माजे काका, तेना आमी आपा म्हणत सलो तेसुद्धा तेंचे गावात म्हणजे नानोडे बांबर एठा मूर्त्यो करीत सले. साधारण चाळीस पन्नास मूर्त्यो घडवीत सले दोनय भाव. म्हणजे शंभर एक घरा सली आमची ठरलेली. सहसा कोण मूर्तिकाराला बदलीत नतले. तेमुळा अपरिहार्य कारण सला जालेच मूर्ती ते घरात जात नतली एखाद वर्खा.

तर साधारण पाऊस सुरू हयवेचे पयली गावातले हे चार - पाच जण मूर्तिकार मूर्त्यांसाठी लागणारी चिकणमाती हाडेचो बेत करीत. ती कोणाला कितकी लागणार ते हिशोबान आण्णूकाकाची अणि तेंचो भाव नानु काकाची अशो दोन बैलगाडयो भरनीं ही माती बहुतेक माळोली ? (नक्की खबर नाय एतां) गावात्थीन हाडेची पडे. ती आपले गरजानुसार प्रत्येकजण कमी अधिक घेय. उरली तरी पुढले वर्षाला ठेवीत. पावसाला सुरुवात जाली कि ही माती भिजे घालेची. मोग साधारण एकादशी ( ?) बी जाली कि गणपती करे घेवेचे. आमची भावंडांची फौज कामाला लागे. आम्ही थोडी थोडकी न्हुय तर सात भावंडा. पण त्याहा कामां पण इतकी कि कोण एक जरी नतलां जाले कमी जाणवत सली अशी परिस्थिती. सगळेनाच अशी चार पाच भुर्गी सतच सली, तेंत कांयेक विशेष नतला.

शाळात्थीन आयलो की पोटात कितां तरी धुकलुनी पायेन माती मळेचा काम करेवां लागत सला. पावसातली माती ‘मूर्तीशाळांत’ हाडणी आलटूनी पालटूनी ती कामा वाटनी घेत सलो. मोग तुडवनी मऊ बरी जालेल्या मात्याला परत कुटणेन (लाकडाचो मोठो घण) कुटेची पडे. तां काम भाऊ करीत. ताकदीचा सला. मोग उफाडे मध्या मातीचे गोळे भरप, ते उफाडेवर आधी गोबराची पुरचुंडी करनीं ती मारेची.

हें कामाला आमी सगळी 'भाऊ में भाऊ में' करीत चढा ओढ लागे. आवडीचा काम. मुख्य शरीराचो भाग भाऊ भरीत सले, अणि मुकुट हात पंजेचो भाग बी आमी भरीत सलो पण भाऊंचे देखरेखीखाल्ती चाले सगळा. भाऊंना कामात कुचराई अजिबात खपत नतली.
उभो गणपती, बेसलेलो, एक पाय सोडलेलो, लोडाला तेकलेलो, आसनावेल्लो, बाल गणपती, झबला घायलेलो, शिवपार्वती सोबत गणेश, गाय, मोर सिंह असे प्राण्यांचे बरोबरचो गणपती अनेक नानाविध प्रकार मागणी सयेल तसे करीत जात सले. शिवाय काही सर्वसामान्य माणसाचे जसे शेतकरी वेषधारी मूर्त्यो सुद्धा भाऊ करीत.

घरचो गणपती खास सत सलो. मोठो अणि देखावेचो. आमला दरवर्षा उत्सुकता सयवेची अमना कसलो गणपती का म्हणी? अणि भाऊ हो गणपती 'फुल हॅन्ड मेड' करीत सले बहुतेक वेळा. उफाडो क्वचित वापरीत. बाकीचे गणपतींचा काम सुरू सताना थोडो थोडो घरचो गणपती आकार घेय.

सगळयो मूर्त्यो केले उपरांत रंग काम. हे काम अणीकय आवडीचा. कितां मजा येत सली म्हणी सांगो. पेट्रोमॅक्स दिवो तेड्ला पेटवेचो. उजेड बरो पडे धवोफुल.

# बाप नावाचा बेट..आमचो भाऊ

सगळयो मूर्त्यो केले उपरांत रंग काम. हे काम अणीकय आवडीचा. कितां मजा येत सली म्हणी सांगो. पेट्रोमॅक्स दिवो तेड्ला पेटवेचो. उजेड बरो पडे धवोफुल.आधी धवो रंग देवेचो सगळे मूर्त्यांना, तेला आलवेत म्हणत सलो, मोग आंगाचो म्हणी. तो रंग तयार करेंचा काम आमचे आपा चा अणि तेचे बरोबर आम्ही मध्या मध्या ढवळा ढवळीकरे. बांबरा वेल्लो आपा आयलो की आमची चंगळ हत सली. तो आयलो की ते दोन भाव कितां गजाली म्हणी मारीत सले देवच जाणे. पण भाऊंचा आमचेवेल्ला लक्ष जरा कमी हय. भाऊंना टरकोनी सलो आमी, पण आपा मात्र कोणाला केड्लाच तापवीत नतलो, समजावनी सांगे केंचीय गोष्ट. तो आयलो की आमचो मोर्चो तेचे पाठल्यान, आपा अणि आपा पुराण. सगळा कितां तां आपालाच विचारेचा. तेचे नेतृत्वाला भाऊंची पण संमती सली. मोग विविध रंगानी गणपती रंगकाम सुरू हत सला. आपा हेचा धोतर कसला करूया? हळडुळां का पाचवां का निळां का धवा? आपा सांगे ते प्रमाण तो रंग देवेचो धोतराला. असा करीत करीत रंगकामात आमी  मदत करीत सलो. मोग दागिने, फुलांच्यो माळो, रुद्राक्ष माळ असे नाना अलंकार ते ते रंगानी रंगवेचे.

एठा पर्यन्त आमचा काम. मोग पुढली दोळेची रेखणी, सुळे/दंत , तोंड, सोंड अशी नाजूक कामां करे दोघ तीघ जण स्पेशालिस्ट.  तेंत भाऊ, श्रीपाद काका भावे अणि गजादादा गाडगीळ (मंदा चो भाव) येत सले. केडला तरी वाडेवेल्लो नारायण चारी पण येय. तो सुद्धा मूर्ती घडवीत सलो. सगळा कसा एकमेकाला मदत करनीं हय, स्पर्धा नतली कोणाचेत. आमी सगळेंचे गणेश शाळांनी जावनी मूर्त्यो बघनी येत सलो. कोणी केंचे केंचे केले ते बघेचे .आवडलेले भाऊंना सांगेचा. पुढले वर्षा असलो करूया म्हणी. मोग उफाडेंची अदलाबदल पण हत सली मागण्यानुसार. काम झाला की रोकडोच परत देव्वेचो जेचो तेला.

रेखणी काम रात्री १०/११ पर्यन्त चाले. आयलेलेना रात्री जेवण आमचेत्याच देत सलो .मध्या जेवण घेवनीं परत रेखणीकाम सुरू. हे गोष्टींना शांतता, मनाची स्थिर बुद्धी लागे. अगदी बारीक नजरांन करेवी लागे. तेवेळा आमी एका कोपरेंत आपा बरोबर हरतालिका रंगवेचा काम गप्प ऱ्हेवनी करीत सलो. तेंचि रेखणी आमी, आपा करीत सलो. पुढा पुढा आमचो आना (मोठो चुलत भाऊ, आपा पुत्र) बी येव लागलो रेखण्याला. बांबरावेल्ले गणपतीचा काम तो बी बघू लागलो आपा बरोबर. आमचे गणपती जाले की भाऊ बांबरावर जात सले. दोन तीन दिवस त्याहाच मुक्काम.  हे अंतर साधारण पाच कि.मी. दूर से धावेत्थीन, अणि तेवेळा पूर्ण रानातली वाट. चालत जायवेचा पडे. मोग चतुर्थी आधी दोन तीन दिवसापाश्णी जेंची मागणी सली ते ते गणपती मूर्ती घेवनीं जायवेला, येंव लागत सले.

एकूण हे मूर्ती काम अणि चतुर्थी पर्यंत सगळी धामधूम चाले घरात दोन महिने. एक सरस्वतीची मूर्ती पण करनी थेवित सले भाऊ, ती धावेंतले शाळांत सरस्वती पूजनाला.

नवरात्रीत अष्टमीला भाऊंना महालक्ष्मीचो मुखवटो करेला दर वर्षा आमंत्रण येत सला. म्हापसे श्री सखा काका आपटेत्यां फिक्स, (अजुनी मिलिंद माजो भाव जासे बहुतेक त्याहा ) गावातय कोणात्या सली जाले जात. पेलतडचे श्रीपाद आपा अणि भाऊ आलटून पालटून जात सले म्हणजे एकाच वेळादोन ठिकाणी शक्य नसे तेड्ला दोघय ठरवनी जात सले.

# बाप नावाचा बेट..आमचो भाऊ

भाऊंचे शेवटचे आजारपणात माझे एकुलते एका भावाला हे काम एक हाती पुढा न्हेणा कठीण जाव लागला. आमी वर्ष दोन वर्षा चे अंतरान लग्न होवनीं सासरी गेलों, तो एकटोच पडलो. म्हणी गणपती शाळा नाईलाजास्तव बंद केली. तेड्ला भाऊंना खूप वाईट दिसला. ते निमतान लोकांचो संपर्क हत सलो, पण मिलींदाची बाजू बी बरोबर सली. मिलींद ही बरो तरबेज जालेलो पण तेचो बी नाईलाज.खूप वर्षापाष्णी सलेली ही शाळा बंद झाली. एतां तो घरचे पुरतो एक गणपती करसे, तेचो बोड्यो पण करसे मूर्ती.

#संगीत व्यासंगी भाऊ
कै. ती. भाऊंचे अणखी एका गुणाची ओळख...
भाऊंना संगीतातली थोडी जाण सली म्हणी तेंनी माला आणि ताईला गायन शिकवेचा यवजला. गोवा मुक्ती स्वातंत्र्य लढेत भाग घेतलेलो तेड्ला तुरुंगवास भोगलेलो, बहुतेक साडे पाच वर्षा. आपण केलेले हाल अपेष्टांची ते आमचेसमोर बढाई मारीत नतले. केड्ला तरी पोर्तुगीजांनी केलेले छळाचो विषय येय तेवेळा सांगत आमी अधिकच पाठ लागलो की.

तुरुंगात सताना तेंचि ओळख श्री. माधव पंडित हेंचेशी जालेली असा म्हणत. तेंचे कड्थीन थोडे प्रारंभिक रागांची ओळख अणि तबलेचा प्राथमिक ज्ञान घेतलां. तितकेच पुरचुंडीवर भागवेचा लागला तेना. पुढां संसार सुरू जालो आणि कामाचे व्यापामुळां (कुळागर,भात वायंगण, काजी इ.) बारमाही कामांचो ढीग. आपले आवडीला मुरड घालेवी लागली. आमची आई पण गाणी म्हणे, त्याचे वडील कीर्तन करीत सले (माझे आजोबा) तांच बाळकडू. घरची गरीबीच. तेमुळा परिस्थिती नतली शिकेसारखी. खेडेत अणि कसा मिळेचा तां? कय तरी आई गाणी म्हणे तेड्ला भाऊ पेटी वाजवीत. पण वाढते प्रपंचात ते दोघांना खूपच कमी वेळ मिळे.

तर असे आमचे भाऊंनी ताई अणि माला तरी गायन शिकवेचा ठरवनी आमचे चुलत काकांची ( कै. श्री. गोविंदबुवा जोशी, शास्त्र शुद्ध गायक ) नियुक्ती केली. तीन चार वर्षा ते येत शिकवे. चौथी ते सहावी पर्यन्त शिकलो दोघी. दोन परीक्षा दिल्यो. पुढा आईचा अचानक निधन जाला अणि आमचे वर घराची जबाबदारी पडली. भाऊ खचले अणि काकांना पण येवेला मन हत नतला. आई आमचे क्लास चे वेळा येवनी आयके बेसे .पण ती गेली आणि आमचा संगीत शिक्षण ही थांबला. आमची आमीच गाणी आयकोनि बेसवित सलो पंचक्रोशीत. ल्हांन सान कार्यक्रम करे आमचे काका आमला घेवनी जात कौतुकान .शैला संध्या छोटयो गायिका म्हणी नाव झालेला.

पुढां में दाहावी जाले उपरांत पुणेत एस. एन. डि. टी .त प्रवेश घेवनी दोन वर्षा संगीत केला. अकरावीत माला तबला विषय सक्तीचो सलो. मोग माला तबला पण शिकेनसा दिसला. दिवाळ्याचे सुट्टयात घरा आयलेल्या तेवेळा एक दिवस घरातलो तबला घेवनी साधारण कोणी वाजयताना बघलेलो तसो धा धिं धिं धा असे वाजवेचे प्रयत्न करीत बेसलेल्या पण आवाज मनासारखो येत नतलो. भाऊनी तां बघितला अणि माला कसो हात ठेवेचो तां समजावनी सांगितला. ते सुटयात में फक्त तबले वर चार ताल बेसवनी पक्के केले आणि पुणेत गेलेवर माझ्या इतर संगीत वर्ग मैत्रिणींना पण शिकयले. कारण हें शिकवे वेगळे सर नतले, आमचा आमला करे हंवा सलां.

## बाप नावाचा बेट..आमचो भाऊ

माला मुळात शिकेची प्रचंड आवड म्हणी बहुतेक लोक्कोर जमला वाजवे. तेमुळा में संगीत विषयात पुणे बोर्डात ही पहिली आयल्या. फायनल परीक्षा चे वेळा माझो तबले वेल्लो हात बघनी परिक्षकांनी खालती घायलेली मुंडी एकदम वर केली आश्चर्यान. (आधी जेंच्यो जालेंल्यो तेना तितका जमला नाय अल्पावधीत, तेंचे बोटांचो आवाज उमटत नतलो).

आज हें सगळा लिहिताना माझे डोळे समोर माझे भाऊ उभे ऱ्हेलेसारखे जाले. अजूनही त्यो आठवणी त्याज्यो सत. डोळे भरोनी आयले लिहिताना. कितकी भाग्यवान में माला असे वडील लाभले.

तेंचेनी तुरुंगात घेतली ती विद्या माला आयुष्य भराला पुरली. पुढा में बेळगावला श्री .विनायक नाईक हेंचे कडा तबला शिक्षण घेतला. कर्नाटक सरकारची सिनिअर ग्रेड पर्यन्त परीक्षा दिली. पुढा प्रपंचामुळा सोडला तबला. ( माजे गुरुजी अजूनीं कौतुक सांगसत 'वहिनी हात खूप छान आहे तुमचा उगीच सोडला तबला' असा ) माजी चेड स्वानंदी मात्र खूप बरां शिकली अणि माला आनंद जालो तेचो. बोड्यो सारंग पण वाजयसे उत्तम तबला. चेड म्हणी तबला शिकों नये अशी ते वेळा धारणा सली. पुरुषांची मक्तेदारी पण माझे वडिलांनी असले भेदभाव केड्लाच मानले नाय. काळा पुढा तेंचि दृष्टी सय सदाच. भाऊ तुमला कितकेय आठयले तरी कमीच.

रोहिणी कुलकर्णी (संध्या सुलभा पांडुरंग जोशी)
बेळगाव.

● ● ●

## गणपुले फाऊंडेशन ची उद्दिष्टे

- आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या न्याती बांधवांना शिक्षणासाठी मदत.
- भारतीय संस्कृतीचे जतन करणे.
- वेद आणि संस्कृत भाषेसाठी काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना मदत.
- शाळांमध्ये संस्कृत भाषेचा प्रसार.
- करिअर व नोकरी साठी आर्थिक दृष्ट्या असक्षम न्याती बांधवांना मदत.
- चित्पावन यूथ फोरम
- चित्पावनी भाषेचा प्रसार.
- नवीन पिढी साठी संस्कार वर्ग.

# देवभूमी उत्तराखंड प्रवास वर्णन

हरिद्वार- हरिद्वारचो शाब्दिक अर्थ से - 'हरिकडा जायवेचां दार'. ( हरिद्वार) गंगा नय, डोंगराच्यो ओळी पाठल्यां सोडीत हरिद्वारचे मोकळे जागेत्थीन त्याचो प्रवेश हसे तां पतितपावन ठिकाण 'हरिद्वार'. महाभारतात हरिद्वाराला 'गंगाद्वार' बी म्हटलां से.
हरिद्वारात भगवान श्री रामाचे पूर्वज, राजा भगीरथान स्वर्गात्थीन गंगेला हाडेसाठी अणि आपले साठ हजार पिढ्यांचो ( पुर्वजांचो ) उद्धार करे, कठीण तपस्या केलीन सली.

भुर्गेमुळां, हे परमपवित्र, पुण्य क्षेत्र 'हरिद्वार' दर्शनाचो योग आयलो अणि माजा मन प्रसन्न जालां. में धन्य जाल्यां.
गंगा आरती, श्री रामदेव बाबांचो आश्रम, ओखदाचे झाडांचे मळे, सूर्यफुल, सासवांचा शेत, गव्हाचां शेत, फळांच्यो बागो, बरे फुलांचे मळे बघ्नी मन प्रफुल्लित, प्रसन्न हंव्नी जासे. पुढां वाकडी वाकडी वळणां घेत, वरती खालती असे मार्गान ऋषिकेशला पावली. लक्ष्मण झोपाळो (झुलो ), राम झोपाळो बघ्नी पुढां उत्तरेकडा हिमालय येसे. परतो परतो वळसो घेत जाणारो अशीर रस्तो. वाकडी तिकडी वळणां सली तरी एका कडांन 'बापायप्रमाण' धीर देणारो उत्तुंग हिमालय जाले दुसरे कडान 'आवशीप्रमाण' जीवन देणारी गंगामाता स्वच्छ स्फटिकाप्रमाण सळसळ व्हावणारी, थंडगार पाण्यान ताहान भागयणारी गंगामैया हेंचे दर्शनान जीवनाचा सार्थक जालां असां क्षणभर दिस्से.

पुढां यमुनेत्रीला जावं लागलों. एकाकडा धवोफुल हिमालय उभो जाले दुसरीकडा खोल खोल घळणां. कांय माणसां चालत, कांयजण घोड्येगाड्यान, जाले कांय मेणेंत्थीन जात सली. वरती चडताना पाऊल संभाळनीं घालेंवा लागत सलां. त्याहां वाटभरी चिखल, घोडेंचां सांडलेलां मलमूत्र, उभी माट चढण तेमुळां आपले जीवाला संभाळ्नी, 'जय यमुने माते' असां, देवीचां मोठ्ठेन नाव घेत सकाळचे वेळा माणसां हळूहळू चढत सलीं. वाटांत बारीक मोठे गुंडे, वरत्थीन हलकोच पाऊस. निसरडीत्थीन मार्ग काडीत चालेचा पडसे. हळूहळू चाललेमुळां सयभोवतालचां देखणां रुप (निसर्ग सौंदर्य) बघ्नी मनाला बरां दिस्से. 'पाईन' नावाची वनश्री, हिमालयाचा आगळावेगळा दर्शन घडसे . एठाचां निसर्ग सौंदर्य, झुळझुळ व्हावणारे पाण्याचे ओघळ मनाला भुरळ घालसत. थंडी इतकी की जाकेट/स्वेटर टोपी घायली तरी थांबत नाय.

सुरूवातीला सगळेला बर्फच सलेमुळां पयलीं थोडो त्रास जालो, पण यमुना मैया मातेचे देवळाकडा पावतकत इतकां बरां दिसलां की शब्दात सांगणां कठीण. यमुना देवीची नाजूक सुंदर मूर्ती बघ्नी मन भरोनीं आयलां. त्याहां गेलेवर गोमुखात्थीन व्हावणारी धार बघ्नी "यमुने माते पाव, प्रत्यक्ष तुजे पायेशी आम्ला येव्वेची शक्ती दिलीस. बळ दिलांस हेच खरां आमंचा भाग्य!" वरती उंच उंच बर्फात लिपलेले डोंगर अणि खाल्ती खोल खोल घळणां. जाले कडाकडान पाचवीचार वनराई. कितां अगाध लिला ही देवाची. उनपाण्याचां ल्हांनसां तळां. तेंत मूठभर तांदूळाची पोटली करनीं बुडवेची. नवल असां की, थोडे मिनटांत तें पोटलीत भात तयार हसे. हो चमत्कार बघ्नी तो प्रसाद घेव्नी, खाव्नी मोग परतीचे वाटाला लागलों.

असां हे घडलेलां हरिद्वार दर्शन वर्णन, एक सुखद अनुभव. || जय जय गंगा मैया ||

श्रीमती रमा गोविंद जोशी, वास्को गोवा.

# नीलिमा..!

सकाळची णऊ वरां जाली. नीलिमा आफीसांत जायवेचे गडबड्यात सली. आज रांधप करेचा नतला, तेमुळां जेवणाचो डबो न घेताच नीलिमान लॅपटॉप खांदेवेल्ले बेगात घायलो अणि  जुती (सँडल) काड्नी पायात घाले सुरवात केली. इतकेत माजघरात (हॉलात)  पेपर वाचीत बेसलेले त्याचे मावान त्याला साद घायलो.

"नीलिमा .. पोरा.. स्कूटर मात हळू संभाळनी चालय ..! एत्ताच में वाचलां चौकात स्कूटर अणि अति वेगात सलेली एक चारचाकी, हेन्चो अपघात जालो से..!"

ते आयकतकत कामाला भाहेर सरतानां हटकू नये हे  मैत्रीणीचां वाक्य एकदम यवजलां.

"बाबा में एतां ल्हान नाय.. में गेली वीस वर्खां गाडी चालयसा" नीलिमान तिरसटपणांन तेनां उत्तर दिलां अणि दोळेंवर गॉगल घाल्नी भायेर पडली.

गेले आठवडेत कंपनीत मुख्य आफिसर हे पदासाठी त्याचो इंटरव्ह्यू जालो सलो अणि आज मिटींगात ते विषयी निर्णय हैय्वेचो सलो. अणि जुस्त भाहेर पडेचे वेळां बाबांनी त्याला हटकलीन सली.

गेले म्हयनेतय तसांच जालां. मायन (सासू) एका मेजवान्याला ( रिसेप्शन) जाय्वे भायेर सरताना "नीलिमा.. शालू बरो दिस्से गो तुला.. आयलेवर दृष्ट काढे हवी बाये!" म्हणी कौतुक केलां अणि तितकेत शालू जुतेंत घुसपोनीं ती पडली सली.!

असे अंधश्रद्धा अणि गैरसमजांवर त्याचो विश्वास नतलो. घरात्थीन भायेर सरताना कोणी आडायला कि काम हत नाय. उंब्रेवर शिकलां कि अशुभ ससे. शिक येवप ही शरीराची नैसर्गिक क्रिया से, तेत कितां अशुभ? हे विषयावर मैत्रीणी बरोबर अनेक वेळा वाद बी घायलो सलो...! अणि आज जुस्त तांच त्याचे बाबतीत घडलां सलां. त्याचो अशा गोष्टींवर विश्वास नतलो तरी मावान ऐन आफीसात जाय्वेचे वेळां दिलेली सुचना त्याला मात्शी खटकली सली.

खरां तर ती अणि निलेश दोघांय बरे मोठे हुद्देवर सलीं. ल्हान वेदांताला सांभाळे घरातलां कोणीतरी हवां म्हणी त्याणींन शैलेशाचे पाठल्या लागोनी आईबाबाना गावाकड्त्थीन बोलाव्नी घेतलीन सली अणि तेनांय तसां नीलिमाचां खूप अप्रूप अणि कौतुक सलां.

नोकरी करनीं बी ती आपलां घर व्यवस्थित संभाळत सली हेचो तेनां सार्थ अभिमान सलो.  नीलिमा आपली 'ॲक्टिव्हा' स्टार्ट करनीं रस्तेतले गर्द्यात रिगली, अणि पोलीसांचे 'चेकिंग स्क्वॉड' हेन्चेनी त्याला आडायली. जुस्त 'पोल्युशन सर्टिफिकेटाची' मुदत सोपलेली म्हणी पाचशे रूपये फारीक करेवे पडले.!

भायेर सरताना  त्याला बाबांचे सुचनांची आठवण जाली अणि मनातले मनात ती परती अस्वस्थ जाली.. अर्धे पाऊण वरान ती आफिसात पावली अणि रोकडीच काम करुं  लागली. वरांभरात महत्त्वाचा काम सोपयलान.

# नीलिमा..!

पण त्याचा मन एतां सैरभैर जालां सलां अणि जसजसो उशीर हंव लागलो  तशी त्याची अस्वस्थता आधिक वाढली.

आज आपलां प्रमोशनाचा काम हयेल काय नाय हेचो त्याला भय जालो. सकाळचे बोलणेन त्याला बाबाचो राग येवं लागलो सलो. प्रमोशनचा सिलेक्शन जर पुढां गेलां तर आईबाबांला गावाकडा परती धाडेची असो विचारही मनात क्षणभर येव्नी गेलो..!

दोन जाली, जेवणाची वेळ जाली सली. डबो हाड्लो नसलेमुळां ती शेजारचे 'हाटेलांत' जायवे गेली अणि त्याला आश्चर्याचो धक्को बेसलो...!

पुढेंत बाबा जेवणाचो डबो (लंचबॉक्स) घेव्नी उभे सले. निबरात्थीन आयलेमुळां तेंचे तोंडावर्थीन घाम निथळत सलो. तेंचे दोळेत्थीन आपले सुनांबद्दलची आपुलकी जाणवत सली..!

"नीलिमा.. अगो.. सकाळी तू डबो न घेतां गडबड्यात अशीच   आयलीस. सकाळपाश्णी 'ही' सारखां घोकीत सली, "पोरगी न खाता - जेयता गेली से !" शेवटी में म्हटलां दे डबो माजेकडा. में न्हेव्नी देसां! आज होळी से नीं तेमुळां आईन खासकर्नी तुज्यो आवडीच्यो पुरणाच्यो खरपूस पोळ्यो धाड्नीं दिल्यो सत. हो घे डबो !" थरथरत, हातातले लेसान कपाळावेल्लो घाम टिपीत बाबान म्हटलांन.

नीलिमा स्तब्ध जाली सली. त्याला एतां गहिवर आयलो. बाबाचे दोनय धोपरांची ऑपरेशना जाली सली आणि काठीशिवाय तेनां चाले येत नतलां. केवळ त्याला पुरणपोळी आवडसे म्हणी, घराभाहेर न पडणारे, पंचाहत्तर वर्खाचे बाबा रणरणते  निबरात्थीन, आईन 'प्रेमान' मायान दिलेलो तो डबो घेव्नी इतके दूर, कंटाळो न करता आयले सले.!

पुरणपोळी खाय्वेचे आधीच त्याचां पोट आज तृप्त जालां. आईचे मायाचे ते साजूक तुपात त्याचां काळीज विरघळोनीं गेलां सलां. एका अदृश्य प्रेमाची त्याला पयलेंदाच जाणीव जाली. एका आपले पोरकट विचारांन थोडे वेळापयली में तेनां गावाकडा परत धाडेचो विचार करीत सल्यां.  हेची त्याला एतां लज दिसों लागली.

त्याणीन हाताला धरनीं  बाबाला खुर्च्यावर बेसयले अणि दोळेंतले थेंबान ओलावलेल्यो पापण्यो टिपल्योन. थंड पाण्याचो  ग्लास तेचे हातात देत म्हटलांन.. "बाबा, किताला इतक्ये निबराचे, इतके दूर आयलेत !" रात्री खाल्यो सत्यो पोळ्यो में? मात्र एतां बजावनी थेयसां. एठाथीन पुढां तुमला कारां भाहेर जायवेचा  सयेल तर माला फोन करेचो. में टॅक्सी धाड्नीं देन."

त्याचा प्रमोशन हे एतां त्याचे दृष्टीनं गौण जालां सलां अणि में आज लोक्कोर घराशी जानांर. त्याणीनं पुढेंतलां मेज (टेबल ) आवरलान अणि बाबाला घेव्नी ती जाय्वे गेली.

## नीलिमा..!

बाबाचे दोळे तपासेवे, म्हणी घरा जाता जाता त्याणीनं तेनां दोतोराकडा घेव्नी गेली. तपासणी करनीं नवां वक्ल ( चष्मा) करे दिलोन अणि आईला एक बरोसो वळेसर विक्तो घेतलोन.

घराशी जायपर्यंत संध्याकाळ जाली. थोडेवेळान आपले मैत्रीणी बरोबर होलिकोत्सवात सामील जाली. मात्र सकाळचां बाबा बरोबरचा आपलां बोलणां त्याला येवजत सलां. वातावरणातली वाईट अणि दुषित उर्जा हेचे बरोबर आपला मन, तसाच अंतःकरणांत गोचीड्या सारखां घट्ट खेटोनीं बेसलेले असे कालबाह्य अणि पोरकट समजुतीचांय बी त्याणीन 'होलिकादहन' केलांन..!

दुसरे दिवस ती सद्दांचे वेळां जागी जाली. उसेकडा थेयलेलो मोबाईल त्याणुनं चालू केलो अणि व्हॉटसअपवेल्ले मेसेज चेक करे सुरवात केलीन..

अणि पयलोच मेसेज सलो, "नीलिमा मॅडम.. रात्री उशीरा 'बोर्ड मिटींग' जाली.. तुमचां  'हेड ऑफ डिपार्टमेंट' म्हणी सिलेक्शन जालां से. अभिनंदन..!"

नीलिमानं आंगावेल्ला पांघरुण कडाला केलान अणि ती बाबाच्या खोल्याकडा धावोनी गेली..! ती आनंदाची बातमी त्याला आज सगळेंत पयली आपले बाबाला ( मावाला) सांगेची सली..!! तेंचे कालचे 'ते' शब्द आज त्याचेसाठी आशिर्वाद हव्नी आयले सले.!

सुहास वझे.
पनवेल.

● ● ●

## पण.. ती

घडोनीं गेलेले घटनांचो मुक्त वावर
काळीज एतां, पडकांच जुनां घर !

भिंतीला चाचपीत, घरांत शांत वावर
अणि पाष्टाला सांगसे, तुला तुच सावर


नाय मिळ्ळो केड्ला, रंग हे घराला
मात्र संवेदनांचा, तोरण लोंबलेलां

सरव्य राखलां भिंतीतले कणाकणांन
घरांतलेघरांत दु:ख लिपयला दारांन

अजूनय उम्बरेवर, पेटसे एक पण..ती
करीत से मनापाष्शी राखण ती घराची

सौ. आरती मोने,
सत्तरी गोवा.

# धगधगता अग्निकुंड सावरकर



२८ मे १८८३ हे दिवसा आमचे देशांत एक धा दिशा दुमदुमणारो असो स्वातंत्र्यवीर जन्माला आयलो. तेचा नांव विनायक दामोदर सावरकर, मुळांतच अतीशय हुशार सलेलो, ल्हानपणातच खूप वाचन अणी मनन सलेलो, शीघ्र कवी अभ्यासपूर्ण भाषण करणारो, तेड्लाचे वर्तमान पत्रात साप्ताहीकांत, विवीध प्रकारचे लेख लिहीणारो असो बालपणांतच आपले गुण प्रगट करणारो तेजस्वी असो भुर्गो नाशिकचे भुगूर एठा जन्माला आयलो.

तेचे सगळे लिखाणाचो शेवट हो देश स्वतंत्र हव्वो हो सलो. संत मंडळी जसां किताय सांगितलांय तरी शेवटी देवाला शरण जा म्हणी सांगसत तसांच सावरकरांविषयी सांगतां येल. सावरकर जेडला पुणेत शिके आयले तेड्ला कॉलेजांतय तेंचो प्रभाव दिसों लागलो. तेड्ला पुणा एकप्रकारचां चळवळीचां केंद्रच सलां.  त्यांहां सावरकराना संवगडीय बरे मिळळेले. त्यांहा तेंचेनी परदेशी कापडाची होळी करेची ठरयली तेसाठी तेना टिळकांचा मार्गदर्शन मिळ्ळा तेवेळा टिळक, शि. म. परांजपे  हेंचेसारखे वक्तेंची भाषणाय जाली, अणी ते वेळावर सावरकरांचे जालेले भाषणांन स्वतः टिळक, शि. म. परांजपे हे प्रभावीत जालेले. तेंचेनी तसां जाहीररीत्या सांगीतलान  'वक्ता दशसहस्त्रेषु' असां तेड्लाच शिक्का मोर्तब जालां.

आमचे धावेतले स्वा.सै. विष्णुकाका वा.वझे हैंचेनी स्वतः तेंची भाशणां आईकलेली सली. तेय खूपदा तेंचेच भाशणांचो उल्लेख करील सले. सावरकर वकिलीचे दुसरे वर्खात शिकत  सताना लंडणाथीन श्री श्यामकांतजी वर्मा हेंचेनी एका वर्तमानपत्रांत निवेदन दिला की 'लंडन हाऊस' लंडन एठा शिष्यवृत्त्या सकट शिकेची सोय से.  जर तसो विद्यार्थी सेल जाले फायदो घेव्वो, हे वाचतकत सावरकरांनी त्याहां जायवेचां थरयला.  तेसाठी स्वतः श्री. लोकमान्य टिळक हेंचा शीफारसपत्र मिळयला.  तां घेवनी ३ जुलै  १९०६ ला लंडनला पावले अणी त्याहा बॅरीष्टरकीचो अभ्यास सुरु जालो.  हे सगळां जालां तरी हेंचा धगधगता देशप्रेम त्याहां कार्यरत सलां.  शिक्षणाचे निमतान त्याहां गेलेले विद्यार्थ्यांना संघटीत करनीं ब्रिटीशां- विरुध्द गुप्तपणांन, क्रांतीकारी चळवळ चालूच सली.

# .. धगधगता अग्निकुंड सावरकर

जो, आमी जेला क्रांतीवीर भगतसींग म्हणसो तो तेच माळातलो. भगतसींगाविषयी अणी एक आख्याईका अशी, एकदा 'इंडिया हाऊस'चे लागी कांय भारतीय विद्यार्थी खेळत सले. त्याहां केंचेतरी कारणान झगडा जालां अणी सरदार भगतसींग अतीशय उध्दट पणान किंवा 'तारुण्यसुलभ वृतीन' म्हणोया खूप दादागिरी करनी बोलों लागलो. तो जीवानय बरो पेचाद सलो. ते मुळां बाकीचेय विद्यार्थी तेला बिचकोनी सत सले.

सावरकर वरते अभ्यासात मग्न सले. तेंचेनी जेड्ला असो बोवाळ आईकलो तेड्ला खाल्ते आयले अणी तेंची खरमरीत शब्दांत हजेरी घेतली. "तुला एठा पालकानी शिके धाडलोसे, उनाडक्यो करे न्हुंय!" तोच भगतसींग तेंचो प्रिय भगतसींग जालो.


एकदा बॉम तयार करेचां प्रशिक्षण चालू सला, तेड्ला रसायन उकळत सला अनी तां उत्रे गावी गावत नाय जाली तेड्ला हेच भगतसींगान क्षणाचोय विचार करीनस्ताना तां हातानीच उतरलांन, पण अधिक उकळता जाले स्फोट हय्वेची शक्यता सली. असे हे धाडसी गुरूशीष्य. लंडणात सावरकरांचे हालचालींवर ब्रिटिशांची बारीक नदर सली ते दरमेन ते बॅरीस्टर जाले. त्याहां ते अती परिश्रमान एकदा आजारी जाले. त्याहां डॉ. मुथू म्हणी एका मद्रासी दोतोराचा हास्पीटल सलां. तेंना सावरकरांचो पराक्रम खबर सलो. त्याहां तेंचेनी सावरकराना फुकट उपचार केले. ते उप्रांत ते कांय दिवस फ्रांसला विसावो घेव्वे गेले. त्याहां ते 'गुरुमुखी' शिकले अणी शिखांचो इतिहास ल्हीलोन. हेच गुरुमुखीचो उपयोग तेंचेय कादंय्त (तुरुंगात), त्याहांचे प्रौढांना शिकवे केलोन. पुढा तेंचेवर 'वेगवेगळे गंभीर आरोप थेवनीं तेनां अटक करनीं भारतात हाड्ताना 'मारिया बोटीत्थीन अणी त्रिखंडात गाजलेली अशी उडी मारली, तो दिवस सलो ८ जुलै १९१०. पुढां तेंचेवर खटलो भरनीं तेनां दोन जन्मठेपेच्यो शिक्षा झाल्यो. १० एप्रिल १९१० ते १० एप्रिल १९६० सुटका. (ह्यो तारखो खात्र्याच्यो मिळत नाय)

तेनां बोटीत्थीन अंदमानात न्हेतानांचा वर्णन आईकलां जाले भवितव्याची कल्पना तेना आयलेली. पुढा तेंचेवर अंदमानात जालेले,(कठोर अत्याचार वगैरे हेन्चेवर लिहनार जाले, तो स्वतंत्र अणी खूप विस्तृत विषय से.)

तरी सुद्धा त्याहां गुरुमुखीचो उपयोग त्याहांचे कैद्याना शिकवे केलोन. तसांच बंगाली शिकोनीं तेनाय शिकयलान. नवीन कैद्याना पयलेच दिवसा वाढताना मुसलमान मुद्दाम वाढे जात सले. तेमुळां तेंची, "आपण बाटलों अशी भावना हय" तेनांसुद्धा सावरकरानी पटोव्नी दिलान. तुमी अख्वो मुसलमान जरी भाजनी खाल्लो तरीसुद्धा तुमी बाटत नाय. त्याहांचे स्थानिक हिंदी बोलत सले पण लिपी ऊर्दू सत सली. तेना हिंदीचे धडे दिले तसांच त्याहां मोठे प्रमाणात शुद्धीकरण मोहीम चालयलिन.

असां आपले त्याहांचे वास्तव्यांत सुद्धा तेंचेनी खूप कार्या केलीसत. तेंचे भोवती क्रौर्य हे सतत घिरट्यो घालीत सलां. असां क्रौर्य सुद्धा तेंचेपुढा नतमस्तक जालां अणि तेंचेनी स्वतःच प्रायोपवेशन करनी २६ फेब्रुवारी १९६६ ला दुपारी ११.३० ला आप्लो देह समर्पित केलोन.

दत्ताराम बर्वे, सातोडे, सत्तरी, गोवा




पादगया क्षेत्र

'गयेक गेलो तो परत न ये' अशी एक म्हण ल्हानपणापाश्णी बरेच वेळां आमचे कानावर पडली सनांर. खरांच त्याहां जाय्वेचां, त्याहां पावेचा अणि सुखरूप परत घरा येवेचां हे एक दीव्यच सलां.

पण दळणवळणाची साधना आयली, घराघरात चार चाकी आयल्यो. जणू पुण्याई पाठीशी उभी ऱ्हेली, अणि माला पादगयाचा बलायणा आयलां. खूप दिवस मनात सलां. जेड्ला जेड्ला "श्रीपाद श्रीवल्लभ चरीत्रामृत " वाचलां तेड्ला तेचे जन्म स्थानाला एकदा दोळे भर्नी बघे हवां असो विचार येय. गेले आठवडेत तो योग आयलो.

संपूर्ण भारतात तीन 'गया' सत. तेत पाद गयाक्षेत्र प्रसिद्ध अणि पुरातन से.भगवान शिव आयलो भक्त गयासूराचे इच्छापूर्तीसाठी. "कुक्कुटेश्वर "स्वामीचे रुपात म्हणजेच कोंबडे चे रुपात स्वयंभू लिंगात अवतरीत जालेलो से. हे स्थान पितरांचे मुक्तीसाठी प्रसिद्ध से. हे कुक्कुटेश्वरस्वामी दर्शनान सगळे पापांचो परीहार हसे अणि सकल मनोकामना पुर्ण हसत, दुःख दूर हसे.

कृतयुगात 'गयासूर' नावाचो दानवेंद्र सलो. मोठो भक्त, तेणी कितकेसेच वर्शां श्री विष्णूची तपस्या केली. त्या उपासनांन भगवान विष्णू प्रसन्न जालो. मूर्तीथिंन प्रत्यक्ष विष्णू प्रकट होवनीं 'गयासूराला "म्हटलां  वत्स तुज्या तपस्यानं में प्रसन्न जालो सां. तू हवां तां माग. हवो तो वर तुला देसां.

## .. पादगया क्षेत्र

हे देवा, ह्या पृथ्वीवर जितकी पुण्यक्षेत्रा सत, ते सगळे पेक्षा में पवित्र हैवो.,असां वरदान माला दे. देवानं 'तथास्तु' म्हणोनी देव अंतर्धान पावलो.

गयासूराचे परम पवित्र शरीरावर्थिंन येणारे वारेन, घोर नरकात न्हेणारे पापांपाश्णी मुक्ती मिळसे.धर्मात्मा गयासुरानं अश्वमेधा सारखे अगणित यज्ञ केले. जो शंभर यज्ञ करी तेला इंद्रपद मिळे. गयासुराला तेड्ला इंद्रपद मिळलां., अणि देव इंद्र पदच्युत जालो.

तो पृथ्वीवरती आयलो. तेणी ब्रह्मा, विष्णू, महेशाची दाहा हजार वर्षापावत कठीण, खडतर अशी तप:श्चर्या केली. ब्रह्मा, विष्णू, महेश्वर इंद्राला प्रसन्न जाले. आमी तुजेवर प्रसन्न जालो सां. माग वत्सा, वर माग.

तेड्ला देवेंद्रानं सांगितला. "हे देवा, गयासुराचे राज्यात लोक त्रस्त जाले सत. गयासूर धर्मात्मा से खरो, पण तेचे अनुयायी खूप क्रुर पणानं लोकांचो छळ करसत. लोकानां कारणाशिवाय मार देसत, बडयसत. ऋषीमुनीनां यज्ञ याग करे देत नाय. पतिव्रता बायलांचो छळ चालू से."

यज्ञ-याग हत नाय म्हणी देवतांना हव्यभाग मिळत नाय म्हणी ते दुर्बल जाले सत. वेळावर पाऊस पडत नाय म्हणी सगळीकडां दुष्काळ पडसे. शेतां पिकत नाय म्हणी प्रजाजन दु:खी ,कष्टी जाले सत. सगळी भूमी उजाड जालेली से. म्हणी हे त्रिमूर्ती माजी तुमचे कडा प्रार्थना से ,लोक्कोर कितांतरी उपाय करा.

गयासूराचो वध करा अणि माजां इंद्रपद माला परत मिळौव्नी द्या. में, तिन्ही लोक आनंदानं न्हेतील असां करीन. ब्रह्मा, विष्णू,महेश" तथास्तु "म्हणोनी अंतर्धान पावले.

देवेंद्रला वरदान तर दिला तां पुरा हय्वे हवां नीं, म्हणी ब्राह्मण वेष धारण केलो अणि त्रिदेव गेले गयासूराकडा. गयासुरानं खूप आदर सत्कार करनीं तेचां स्वागत केलान. अर्घ्य, पाद्यपूजा केली अणि विचारलां "महात्मा आपण कारणा शिवाय कारे जात नाय. केंची कार्यसिद्धी हय्वे हवी म्हणी तुम्ही आयले सां?

कार्य हयवे हवां जाले, साम, दाम, दंड, भेद हे उपाय सत, पण गयासूराला 'दानाचे' उपायान चीत करता येल असां ब्रह्मा, विष्णू,महेशाला दिसलां.

तेंचेनी गयासुराला म्हटलां "हे धर्मात्मा, गयासुरा तु व्यक्तीगत स्वार्थासाठी केंचीच इच्छा धरीत नाय. तू त्रिलोकीचो अधिपती सय. तुजे राज्यात भूलोक सगळे जीवांचा दुर्भिक्ष, पीडा सहन करीत सत. पाऊस पडत नाय म्हणी पिकां येत नाय, लोक संकटात सत, खूप दु:खी झालेले सत. तेंचे दु:ख निवारणार्थ एक यज्ञ करे होवो, सात दिवस मोग पाऊस पडेल. धनधान्य पिकेल. त्रिलोक सुखी हतील.

# .. पादगया क्षेत्र

गयासूरान धन्यता मानली अणि लोक्कोरात लोक्कोर हो यज्ञ सुरू करे हवो. यज्ञाला लागणारी सामुग्री, धन, वस्तू सगळेची योजना करनी यज्ञासाठी केंचा पवित्र स्थान यवजसा?

गयासूरा यज्ञासाठी पवित्र स्थान? हे पवित्र यज्ञाचो भार पृथ्वी सहन करू शकत नाय, कारण पापी लोक भूमीवर वावरसत. स्नान, दान, तप यज्ञयागान ही भूमी प्रदुषित जाली से. केवळ एक पापरहित असा तुजा शरीर से.

महाविष्णूचे वरदानान तुजो देह पुण्य क्षेत्रापेक्षा पवित्र जालेलो से. तुला मान्य से जाले, तुजे प्रेमळ पवित्र असे शरीरावर आमी हो यज्ञ करू. गयासूर आनंदान तयार झालो, पण एक अट से. जोपर्यंत हो यज्ञ चालू से तोपर्यंत तुजा शरीर अजिबात हालता नये. शरीर हालला जाले सगळां मुसळ केरात. यज्ञ सफल हय्वे हवो, पण तेसाठी तुला आत्मसमर्पण करे हवां. तुला हो दंड सहन करेचो पडणार. राजीखुशीन (आनंदान) गयासूर  तयार जालो.

सात दिवस यज्ञ चालला. समस्त देवगण, ऋषीमुनी, गरुड, गंधर्व, कीन्नर अणि प्रजाजनान भाग घेतलो. गयासूरान आपले सामर्थ्यान आपलाच शरीर मोठा केला. तेचा मस्तक बिहार प्रांतातले गया क्षेत्रात, नाभी स्थान ओरीसातले जाजपूरात अणि पाय परम पवित्र असे आंध्र प्रदेशात, पूर्व गोदावरी जिल्हेत पिठापुरात. एतां तेला पादगया पुण्य क्षेत्र म्हणसत.

सात दिवस गयासूरान आपला शरीर निश्चल थेयलां.

अजूनी यज्ञ पूर्ण जालो नतलो पण शिवान कोंबडे चे रूपात बांग दिली. गयासूर हाल्लो. यज्ञ नियमाचो भंग जालो म्हणी तुला मृत्यू दंड मिळणार.

गयासूराला हे त्रिदेवाचा कपट कळलां. “जातस्य मरणम् ध्रुवम्” जो जन्मलो तो केडला ना केडला मरनारच. तुमचे हातानं माला मरण येसे, हे में माझा भाग्य समजसां.

त्रिदेवांनी तेला अंतिम इच्छा विचारली. माजे मरणानंतर माजे शरीराची प्रमुख तीनआंगा ‘गया क्षेत्र’ म्हणी प्रसिद्ध हय्वीत. तीन जागेवर तुमची मूर्ती वेगवेगळे क्षेत्रावर स्थापित हव्नी, तीनय स्थाना शक्तीपीठ, मुक्ती स्थान, पवित्र स्थान हयेल. असा वरदान मागितला.
आजय एठा अन्नदान करसत अणि तिनय क्षेत्र परम पवित्र मानसत. तेचा दर्शन घेव्वे मिळलां म्हणी ते बद्दल थोडा लिहीलां.

गायत्री श्रीपाद भुस्कुटे.
खोर्ली, म्हापसा गोवा.

## चित्पावनी शब्दकोडा

कोडेत उभे अणि आडवे लपलेले अकरा चित्पावनी शब्द सोदनी काडा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| घो | आ | य | द | णां | दो |
| टु | आ | स | र | णां | ळो |
| रो | त | क | सु | ड | को |
| ना | प | मि | र | सां | गो |
| स | लां | स | ळा | थी | को |
| णो | प | ण | सु | लां | प |

सौ. मिनल नेने, पुणे

● ● ●

## चित्पावन यूथ फोरम ची उद्दिष्टे

- ज्या चित्पावन तरुणांना आपल्या ज्ञाती साठी काहीतरी करायची इच्छा आहे अश्या तरुणांचं एकत्रीकरण करणे.
- चित्पावन ज्ञातीच्या संवर्धनासाठी कोणते उपक्रम राबवावेत या बद्दल विचार मंथन करून कृती करणे.
- चित्पावन तरुण / तरुणींना शिक्षण, नोकरी, व्यवसायाबद्दल मार्गदर्शन करणे.
- तरुणांना आपल्या ज्ञातीचा अभिमान वाटेल अश्या गोष्टी, आपला इतिहास दाखवउन देणं आणि अशाप्रकारच्या उपक्रमांमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित करणे.

अधिक माहितीसाठी व युथ फोरम मध्ये सहभागी होण्याची इच्छा असल्यास संपर्क करा.

# माहेरवाशीणीचा मनोगत

एका माहेरवाशीणीचां मनोगत कवितात्थीन मांडेचो ल्हान सो प्रयत्न केलोसे.
माहेरवाशीणीला हेचेपेक्षा अणिक कितां हवां ?

चेड से एकुलती एक
मोग कितां, एकुलत्या एक माहेरवाशीणीचे लाड करे सत अनेक
आई-बाबांचे मनावर ह्याचाच राज्य
त्याचे व्यतिरिक्त आईबाबाचा करे कोण सयेल सज्ज ?
माहेरवाशीणीला हेचेपेक्षा अणिक कितां हवां ?

आवय बापायच्यो दोन चेडी
जणू भाद्रपदात येणाऱ्यो ज्येष्ठा कनिष्ठा गौरी
त्यांना हवी फक्त मायेची सावळी
जेड्ला जेड्ला येसत माहेरा घेवनीं आनंद
त्यांचे सानिध्यात मिळसे सगळेंना पर्मानंद
माहेरवाशीणीला हेचेपेक्षा अणिक कितां हवां ?

आई, नाकां घालू पुरणपोळ्यांचो घाट
घावन घाटले करनीं, हयेल आमचो थाटमाट
असां सांगोनीं करीत ससत आईचो व्याप कमी
तितकोच मिळेल चकाटानां वेळ
इसपिकांचो खेळ बदाम सत्ती अणि रमी
माहेरवाशीणीला हेचेपेक्षा अणिक कितां हवां ?

आई वडिलांची ती चेड
बरोबर भाऊराया एक
नांद्से सौख्यांन वयनीं, सुखान सगळीं
असे माहेरवाशिणीची गोष्टच वेगळी
त्याहां भाचरां सत बेशबरी
माहेरवाशिणीला हेचेपेक्षा अणिक कितां हवां?

येव्नी माहेरा बघीन हसप सगळेंचा
हयेल ती तृप तृप्त मनभरनीं
कुलदेवतेकडा मागणां, हंव्दे कुशल मंगल सगळेंचा
अजून काय नाय ध्यानी मनी.
सगळेंचो आनंद ती दोळे भरनीं बघसे.
सासरी जातानां सगळां मनात थेयसे
माहेरवाशीणीला हेचेपेक्षा अणिक कितां हवां ?

सगळे माहेरवाशीणींना समर्पित

सौ. मिनल आगाशे, पुणे
चित्पावनी अनुवाद : सौ. आरती मोने, गोवा

# भिंग भंगी बिंग



अरे आरश्या, तुला बघले बरोबर माजे तळपायांची आग मस्तकांत जासे रे. में माजेपरीन म्हणी झकपक दिसेचो, निदान नीटनेटको दिसेचो, किंवा अगदींच बावळट न दिसेचो आटोकाट प्रयत्न करसां. कोण बघीत नायसो बगनीं तोंडाला पावडररुपी गोबरसुद्धा थापसां. पण तुजे पुढेंत येवनी ऱ्हेलो काय, काल तरी आजचेपेक्षां मात्सो बरो दिसत सलों, असो समज येव्वो असां माजां रूप तू माला दाखयसय.

तो बेसीनाकडा से तो तुजो भाऊच, पण तो तुझेसारखो ऩ्हूय, तेंत बगसां तेड्ला माजो माला में बरो दिससां. अर्थांत तेचो बाबडेचो एतां पारो उडोनी गेलोसे, अणि उरलेलो जागो व्यापलोसे कुंकू टिकल्यांनी! तेंत्थीन जितको शक्य से तितको माजो चेहरो माला दिससे. मनाला मात्शी टवटवी येसे.

तुला में माजे बेडरुमात हाडनी विराजमान केलो से तांच चुकलां माजां. तुला हाड्लो तेड्ला खबर नतलां माला की तुला बोलेय येसे. में तुला खोकेंत्थीन (बॉक्सातून) भायेर काडनीं भिंतीवर लटकायलो अणि तुजे समोर उभो ऱ्हेले बरोबर तू माज्यो एकेक भानगडी सांगे सुरवात केलीस. तेड्ला घरांत माजेशिवाय अणि कोणच नतलो म्हणी मे सालवार! तेड्लापाश्णी में एकटोच ससां तेड्लाच तुजे पुढेंत ऱ्हेंव लागलों.
तुला हाड्लो तो काळ नेमको करोनाचो. बाजारांत जावनी साधी दाढी करेचीसुद्धा चोरी. तरी बाबडो आमचो फॅमिली म्हालो,(फॅमिली डॉक्टर ससे तसो!) सक्काळीं लोक उठेचे पयलीं येवनीं केंस दाढी बोडकावनी जांत सलो.

# भिंग भंगी बिंग

तो पयलेंदाच आयलो तेड्ला, केंस मारताना, में माजां तोंड माला दिसे हवां म्हणी तुला पुढेंतच एका स्टुलावर थेयलेलो. तितकेंत तुला तो म्हालो दिसलो. "आयज इडी ना मरे तुज्या कानार!" हे वाक्यान तू सुरवात केलीस मात्र, में रोकडोच तुला घरांत न्हेवनीं लिपव्नी थेयलो. तो विड्यो ओढसे हें आमला खबर सलां, पण आईचे पुढेंत बी तो ओढीत नतलो. तू अणि कितां बडबडेचे आधीच मे् तुजी बिडकी उखलली.

पण ते तुजे एकाच वाक्यान म्हालेला कळेची ती गोष्ट कळली अणि बोलणारो आरसो में हाड्लोसे ही गोष्ट गांवभरीं हयवे वेळ लागलो नाय. "बघुया तरी कसलो आरसो तो " असां म्हणोनी रीघ लागली लोकांची.

तो खुशाली बाबडो भोलूकाकात्यां दिसवडेला जासे. दिवसभरीं कितां कितां कामा करीत ससे. तसो देखरेखीला कोण नसेल जाले कामचुकारपणा करसे, नाय असो न्हूय, पण तो तुला बघे म्हणी आयलेबरोबर तेचो सरळ ( डायरेक्ट) पाणउतारोच करेची तुला गरज नतली. "आज काय हाडलय चोरून काकाचें? नाल काय बेडे ?" आणि भिंडांची सोलां काकाच्या खळ्यांत ना तितकीं तुज्या खळ्यांत सुकता मरे. आणि त्या गारफाक हजारांवयर तोरां आसली, ती तेच्या घरांत पावासर साताठशेंच जाली मरे, ना? उल्लेले तुजे बायलेन इकले मा बाजारांत व्हरोन?" इतकीं सगळीं वाक्यां तुजे तोंडात्थीन एका दमात भायेर पडलेबरोबर खुशाली बाबडो आयले पावलान तोंडधापनीं भायेर सरलो.

आमचो शेजारी रमानाथ लीप देवभोळो. सद्दानीं सकाळीं आन्हिक उरकेचे आधी तो मोबाईल वर सगळेना "श्रीराम जयराम जय जय राम " किंवा "ॐ नमो भगवते वासुदेवाय" किंवा "शुभ शुक्रवार, शुभ गुरुवार" असे भावभक्तीन भरलेले मेसेज धाडसे. सकाळीं रोकडां कामावर जायवेचां सलांसुद्धा तरी जवळजवळ दीड तास तेची देवपूजा चालू ससे. दर म्हयनेतत्थीन घरांत तो एखादां तरी धार्मिक कार्य करसे. केड्ला सत्यनारायण, केड्ला उदकशांत, गेलो बाजार कसलो तरी पाठ वाचेचो किंवा लघुरुद्र बी असलां कितांतरी ससेच.

तेचां सोवळांओवळां मात सामखां कडक! आपले देवघरांत तो इतर जाती/धर्माचेच न्हूय, आपले लागींचे लोकांना सुद्धा फिरकों देंत नाय.

तेचेकडा एक दिवस 'एसी सर्विसींग' करे कंपन्याचो माणूस आयलो. बरो झकपक कपडे घालनी, बूटबीट घालनी ओर्रात आयलेलो. फोन करनीं तेणी रमानाथाची आधीच अपोईंटमेंट घेतलेलीन. रमानाथाचे देवभक्तीचां फळ का कितां नकळे, पण केड्लाच वेळावर न येणारे मॅकेनिकाचे जातकुळींतलो सोवनी सुद्धा तो अगदीं सांगलेले वेळावर हजर झालो. आमचेकडा आमी केड्लाय हेंना बलायले जाले हेंच्यो नेमक्यो गाड्यो पंक्चर हसत, नाय जाले हेंची गाडी कुत्रेला आडवी जासे, किंवा "तुजो फोनच लागना मरे, कितल्ये फावटी ट्राय केलो?" असां माजी कांयच चूक नसताना माला आयकोनी घेवेचां पडसे. खरां म्हण्जे तेणी फोन बी कांय केलेलो नस्से, पण "दाखय तुझो कॉल लॉग"! असां म्हणेची माजेत हिंमत नाय हे तेला बहुतेक माजे तोंडाकडा बघले बरोबर कळसे.

पण रमानाथाला मात्र ते मॅकेनिकान गेटीकडथीनच "गुड मॉर्निंग सर" म्हणोनी अभिवादन केलान. तेवेळा रमानाथाचो कसलो तरी जप चालू सलो. तेमुळां खुणानच तेणी अभिवादन स्वीकारलान. तो जेमतेम एक पायरी चढलेलो मात्र, रमानाथाला नाईलाजान जप मध्यांच थांबवेचो पडलो.

# भिंग भंगी बिंग

रमानाथान मौन सोडनी तेला पाय-यावरच थांबयलोन अणि पायांतले बूट काढ म्हणी सांगलान. लायटीकडा काम करताना घालेचे पडसत, नाय जाले शॉक येंव शकसे बी सांगोनी बघलान ते मॅकॅनिकान, पण, "तुला हवे जाले में माजेकडले सोवळेचे बूट घाले देसां, हेते भायेर काढ" म्हणी रमानाथान तेला बजायलान. में तसां सांगलेलां जाले तो मॅकॅनिक माजां काम न करतांच परत जानार सलो. पण रमानाथाचां म्हणणां तेणी निमूटपणान मानलान! पायांतले बूट ( खरां म्हण्जे बुटांतले पांय ) काढनीं तो वरतो पडव्यावर आयलेबरोबर रमानाथान परत तेला थांबयलोन, अणि घरांत जावनी एक सोवळां / मुकटो हाड्नी तेला दिलोन. ते मुकटेला पाणी लागले दोन-चार वर्खां उलटलींसत हें तेचो रंग बघतकत कळत सलां! रमानाथान ते मॅकॅनिकाचे आढेवेढेना न जुमानता तो मुकटो, मुकाटेन तेला नेसूं लायलोन,अणि मोगच एसीचां सर्विसींग करनीं घेतलान.

असो हो सच्छील गृहस्थ एक दिवस सकाळीं तुजो लौकिक आयकोनी आमचे घराशीं आयलो. येताना सुद्धा तेचे तोंडांत रामनाम सलांच. में केलेले चहापाण्याचे विनंत्याकडा दुर्लक्ष करनीं तेणी माला आरसो बघे आयलोंसां म्हणी सांगलान.

एरवीं प्रत्येकाच्यो उणीवो, दोष सांगणारो तू, आज मात्र नि:शब्द हनार हेची माला खात्री सली. हे देवमाणसाविषयी तू वाईट बोलों तरी कितां शकनार? तुजी बकबक बंद करणारो कोणतरी आयलो म्हणी में मनोमन खूष जालों. अणि भिरक्यांतच तेला घेवनीं तुजे पुढेंत आयलों. रमानाथ तुजे पुढेंत उभो ऱ्हेलो, अणि माजो अंदाज खरो ठरलो. माला आनंद जालो. तुझे पुढेंत उभो ऱ्हेवनी बरोच वेळ जालो तरी तू कांयच बोयलोस नाय. म्हंजे तुला फक्त लोकांचे दोषच दिस्सत, गुण एकय दिसत नाय....असे विचार माझे मनात येसत म्हणेसर तू तोंड उघडलांस.

"अरे! ऑफिसांत तू बरे पोस्टवर सय. पण बरी पोस्ट म्हंजे बरां खायवे मिळसे ती पोस्ट असो अर्थ तू करनीं घेतलोसय! एक्काय माणसाचां काम तू पैसे खाल्लेशिवाय करीत नाय. तुजे तोंडांत हे जां राम राम चालू से असां लोकांना दिससे, तां प्रत्यक्षांत "दाम दाम" से! एक मात्र खरां की पैसे खायवेचे बाबतींत गरीब श्रीमंत, उच्च निच असो भेदभाव तू अजिबात करीत नाय. पैसे देवे कांकू करसत तेंचे तोंडावर तू, आज सायब आयलो नाय, नेट चालत नाय किंवा सर्वर डाऊन से, अशी कारणां तोंडांत साखर थेवनी तू फेकसय. दहा वीस कडा जमिनी अणि फ्लॅट घेणां अणि गाड्यो बंगले हें तुला मिळसे ते पगाराचे पैसेनी होणा शक्य नाय. लोकांना फसयणा सोपां से रे पण मात्सां तुजे अंतर्मनात बघ, मात्शी तरी लाज दिसनार तुला स्वतःचीच!”

"अणि तां सोवळेपणाचा अवडंबर तू किताला करसय तां लोकांना खबर नतलां तरी माला से. देव्हारेचे खालते लाखांनी रुपये तू लिपवनी थेयले सय, म्हणी तू तेग्डा कोणाला फिरके देंत नाय तां मे जाणसां.”

अणि कितां कितां तू तेला बडबडलोस. तो बाबडो घामाघूम होवनी भायेर आयलो खोल्यांत्थीन अणि तडक चालों लागलो. मान सुद्धा वरती करनी बघलीन नाय तेणी. मालाय बी तेचेकडा बघेची हिम्मत झाली नाय.....

माधव जोशी, धारखंड,वाळपई, गोवा

# ||श्री|| आगमन

काल माजे स्वप्नांत गणपती बाप्पा आयलो
येसां में अवघे दिवसांनी असां सांगो लागलो ||ध्रु||

मोग कशी कितां सुरू से तयारी, असांय विचारीत सलो
अधिक काय नाकां, मनापाश्णी भक्ती कर म्हणत सलो ||१||

जमला ते इतकांच कर
तांबड्या जस्वंदीचा फुल, केगद अणि कमळ,
माला मात नक्की अर्पण कर
नाकां ती कापेतिची फुलां अणि हार
तेपेक्षा बऱ्यो तांबड्यो, अक्षता घाल चार ||२||

पाचव्योच आरोग्यवर्धक दूर्वा बी हाड!
नैवेद्याला जां रांधशील तांय थोडां वाढ
खोबरा- गॉड पुरणांचे, उकडीचे मोदक कर
तेवर साजूक गावठी तुपाची धार धर
पंचखाद्यय चालेल एखादो दिवस...! दाखय नैवेद्य, थेव्नी तेचेवर तुळस ||३||

माज्यो चार काण्यो, भुर्गेंना बेसव्नी सांगा
कळोंदेत तेनाय बी, माजी सगळीं आंगा
पुजुनी शाडूच्या मूर्त्याला, पर्यावरण शिकोया
नैसर्गिक आरास करनीं समतोल राखोया ||४||

ढोल ताशे लेझिम, हि वाद्यां आवडीची
करा माजे कान तृप्त, साथ संगीत सुरांची
हसे त्रास माला आधुनिकतेचे DJ चो
हेचेच साठी सलो का? अट्टाहास टिळकांचो
थोडो करा विचार, तेंचे दूरदर्शी विचारांचो ||५||

करा हौस तुम्ला हवी ती, नाकां केवळ नखरे
तकल्यावर बर्फ, जिबल्यावर साखर थेव्नी
सगळे उत्सव आनंदान, करा साजरे ||६||

देन तुम्ला आशीर्वाद भरभरूनी में
सुखकर्ता में दुःखहर्ताय बी में
येनांर सां तुमचेत्या लोक्कोरच में ||७||

पहाटी स्वप्नांत्थीन जागी जाल्यां
स्वप्न सरला, नदर उरली, ओठांनी म्हटलां
गणपती बाप्पा मोरया..!
तुजे आगमनाचे वाटावर, मन आतुर गणराया ||८||

सौ. मिनल आगाशे, पुणे
चित्पावनी अनुवाद : सौ. आरती मोने, गोवा

# संत भगवान श्री श्री गोपालबाबा महाराज

आंध्र प्रदेशातले विशाखापट्टणम रेल्वे स्टेशनावर शेकडो वर्खांचे अखंड समाध्याथिंन उठोनी, एक अवलिया अवतरलोतकल्यावर जटा कमराचे खालती पर्यंत. हातांचे नाखटांची भेंडोळी जालेली, पायेंची नाखटां बेसोनी ऱ्हेलेमुळां वेल्लेवाटान वळलेली, दिगंबर, रेल्वे प्लॅटफॉर्मवर येणारे जाणारेंचे नजरांत, हो अवलिया वेगळोच दिसे. हळू हळू तेचा नाव कळलां, हो अवधूत, हो अवलिया म्हणजेच सद्गुरू भगवान श्री श्री गोपाल बाबा महाराज.

तेंचो आश्रम बघे मिळ्ळो म्हणी हेंचे विषयी लिहिसां.

दूरचे लोक श्री गोपाल बाबानां, चाहा, जेवण देंवलागले,भ्येत भ्येतच.एक दिवस गोपाल बाबा एका भक्ताला म्हणो लागले,"मुझे तेरे घरमें बारा साल रहने का है. "आनंदान  तो  श्री गोपाल बाबाना घेवनी आपले घरा गेलो. बारा वर्षा त्यांहा ऱ्हेले उपरात श्री गोपाल बाबा नरसीपट्टणम्, राजमुंद्री, हैद्राबाद, बंगलोर असे वेगवेगळे शहरात तेंचा वास्तव्य सलां.

दोन हजार आठ सालात, दसरेचे दिवसा श्री गोपाल बाबा पिठापूरला जाताना, बाबान गाडी एकदम थारायली, अणि सोमतीच शेतात घेव लायली.  तां शेत म्हणजे एतां से तो आश्रम.

शेवटपर्यंत हेच आश्रमात ऱ्हेले. केड्लाच पीठापूर सोडलां नाय. केंचेच भक्ताचे घरा ऱ्हेले नाय. आश्रमात येतकत, श्री क्षेत्र शिर्डीथिंन, साईबाबांचे द्वारकामाईथिंन अग्नी हाडे सांगलोन अणि ‘अब धुनी चालू करो’ असां म्हणोनीं श्री गोपालबाबान स्वतः चे हातानीं १०८ नारळ अर्पण करनीं एतां आश्रमात से ती अखंड धुनी सुरू केली.

ही धुनी श्री गोपाल बाबा, दत्तभक्तांचा कर्म, प्रारब्ध, व्याधी निवारण कार्य अखंड चालू से.तेंची गोशाळा से. त्यांहा ओंगुल, म्हैसूर, गिरी गाई सत. नित्य नेमानं कपिला गायीचा पुजन, रुंबड ( औदुंबर) वृक्षातळा श्रीपाद श्रीवल्लभाना पंचामृत अभिषेक करसत.

श्री गायत्री होम, श्रीपादाना अणि अखंड धुनीला नेवेद दाखव्नी, अन्नदानाला सुरुवात हसे. मोग संध्याकाळां श्रीपाद श्रीवल्लभ पालखी काडसत.

पौर्णिमा तिथीला श्री सत्यदत्तव्रत, श्री गायत्री हवन, ऋषीपुजन करसत. एक शिवपुजन, शनवारचे प्रदोष काळांत तैलाभिषेक, तिलाभिषेक करसत.

श्री गुरूपौर्णिमा, श्री राखी पौर्णिमा, श्रीपाद श्रीवल्लभ स्वामी जयंती महोत्सव, महालय अमावास्या, विजयादशमी, कार्तिक पौर्णिमा, महाशिवरात्री असे महत्वाचे पर्वांत महाअन्नदान करसत.श्री गोपाल बाबा सदा उन्मनी मौन अवस्था. तरीही ते मराठी, इंग्रजी, तेलगु, उर्दू, राजस्थानी, जाट, पंजाबी इतके भाषांत अस्खलित बोलत सले. नित्य त्याहांचे आवाज कानात घुमत ऱ्हेसत ते असे.

दत्तात्रेय स्वरूपाय दयार्द हृदय सागरे ।
दमशम दयामूर्ते गोपाल बाबा नमोस्तुते ॥ नमोस्तुते ॥

गायत्री भुस्कुटे, खोर्ली, म्हापसा, गोवा

# निर्णय तुमचो



"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षीही सुस्वरे आळवीती ". ही अशी गाणी आईकली की, मनाला कोमरी फुटले खारखी दिस्से. अणि खरांच से. आपलो निसर्ग, नयी, व्हाळकुटां, समुद्र, डोंगर, झाडां, वेली, वृक्ष, फळां फुलां असो नटलेलो से. असां दिस्से कि, या सृष्टीन जणू हिरवो शालुच नेसलो से. ह्या भुमातेच्या कुशीत, ज्येला मन से, बुध्दी से, वाणी अणी दृष्टी दिली से, असो मानवी जीव परमेश्वरान निर्माण केलो. म्हणी हे निसर्गाशी आपलां अतूट नातां से. पण ही विण कारीतरी सैल हत जासे, हेचां खुप वाईट दिस्से.

आजकाल लोकांची सुखाची व्याख्याच निराळी जाली से. बंगले, गाड्यो, मोबाईल, हॉटेलातला खाणा, फिरणां असांच कितांतरी म्हणजेच सुख मानसत. हे सगळां शहरात न्हेवनीं मिळसे ही मानसिकता तयार जाली से. पण आज खेडेंत ह्यो सगळ्यो सुविधा उपलब्ध सताना, जाणतेनी वसयलेल्यो जमीनी, कुळागरा शेतांभाटां  विकनीं, ते शिमीटाचे जंगलात जायवेचो अट्टाहास किताला म्हणसा में ? कमी कष्टात कमी वेळात आर्थिक बाजूघट्ट करेची धडपड. फक्त पैसो, पैसो अणी पैसो.

पयली सुखसोयी उपलब्ध नतल्यो तरी जाण्टे जगलेच का नाय ? आपलो सौसार बऱ्या तऱ्हांन केलोच का नाय ? उलट कष्टाचे कामात्थीन मन:शांती मिळत सली. अणी आरोग्यही बरां ऱ्हेत सलां. शेती करेची, भाजीपालो पिकवेचो, कुळागराची कामां करेची, जातेवर दळेचां, बावीचां पाणी काढेचां, गोरवांवासरांचा करेचां, शेण सारवेचां लाकुडकाठी जमवेची, कुळागराचे वावर करेचे, सोलां भिंडाचा काम करेचां, पणसाची शाक करेची, सालां घालेची. इतकां करनी कारां जायवेचां जालां जाले चालत जाव्वेचां. ते कारणान आपसुख व्यायाम हत सलो. एतां सारखो आडेचो व्यायाम करेची गरजच नतली. आजचे पोरांना व्यायाम करे जिमांत जाव्वां लागसे. तसांच, आसुडेचां सुप खबर नाय, जाले तेनां टॉमेटोचां सुप खबर से.

एतां कसां जालां से, गाड्यान जायवेचां, ऑफिसात एसीत बेसेचां. परत येताना गाड्यान येव्वेचां. घरा येतकच  टिवीचे पुढेत सोफेवर बेसोनी खायवेचां प्येव्वेचां ( खाणे पिणे ). मोग आपलां आरोग्य कसां बरां उरनार सांगा ?  मुळव्याध, मुतखडो असले तरातराचे रोग हयवेचेच.

# निर्णय तुमचो

आपलो भारत कृषीप्रधान देश से. हाल्लींचे भुर्गेनां शेती, कुळागरात काम करेचां म्हटलेवर कमीपणाचां दिस्से. एलर्जी हसे. (में आत्मस्तूती करीत नाय पण मनापाश्णी तुमला अभिमानान सांगसां), हे बाबतीत आमी भाग्यवान सों. कारण आमचे सारखीच आमचे दोनय भुर्गेना झाडापेडाची आवड से अणी हे सगळां करसत हे महत्वाचां. माजां म्हणणां असां से की, सगळेंनी नोकरीच करेची म्हटली तर शेती कोण करणार ? शहरात भलोमोठो पगार सलो म्हणी पैसो खायवे मिळणार का ? नाय नी ?

शहरात सगळ्यो सोयी सत, उच्चशिक्षण मिळसे, हवां तां लागी मिळसे. व्यवहार ज्ञान वाढसे (?) असां बरांच कितां..... पण सुख, समाधान, शांतता, शांत निद मिळसे ? नाय ! पैसेन हे मिळत नाय. माजे मतांन हे लोक मात्से भित्रे ससत. अणी नाजूक ससत. झाडापेडांची ओळख नस्से. प्राण्यांचो भय दिस्से. एतांतर रानटी प्राणी गावात, घरात येंव लागले. तसे हेला आमीच जबाबदार न्हुय का ? सगळां रान कातरूनी कातरुनी प्लॉट करनीं विकसत. त्याहां मोठमोठ्यो बिल्डिंगो उभ्यो ऱ्हेसत. गरमी वाढसे. मोग खजुराचां झाड लायसत. कुंड्यानी झाडां लायसत. कुंड्यातली ही झाडां कितकी सावळी अणी ऑक्सिजन देनार ? हे फ्लेटरुपी डबेला ना खळां ना पोरसू. एकदा भितर रीगलो की दार बंद. फ्लेटातले जर कोणाला बरां वाइट जालां जाले, तर आपलेपणा न दाखयतां, दाराचे भिंगात्थींन बघेचां. व्हिडिओ काढेचे. अणी फॉरवर्ड करेचां काम करेचां. हेउलट खेडेगांवातले लोक, मात्सां कोणाला खरवडलां तरी धावोनी येसत, मदत करसत हो फायदो से.

दुसरी गोष्ट अशी कि, शहरात सगळांच विकतां. खाणांपिणां, भोवे, गार्डनात जानांर जाले पैसो, प्येव्वे ( पोहायला ) जानांर जाले पैसो. घराची राखण करे सेक्यूरीटी, तेला पैसै. पण आमचां आपलां बरां. घरचे पोर्सात भाज्यो मिळसत, अडत नाय. गार्डन नाकाच. कुळागरात एक पासय मारली कि शुध्द हवा मिळसे. व्हाळावर, नयवर न्हायवेचां. स्विमिंग पूल ची गरजच नाय. घराची राखण करे हवी जाले, एक गावठी कुत्रो पोसलो की तो प्रामाणीकपणांन काम करसे. सगळांच नाय पण थोडांतरी फुकट गावसे. शहरात पैसेवर बेसेचां अणी पैसेवर उठेचां. एकटेच्या मिळकतीवर भागत नाय. म्हणी बायलाला कामावर जायवेचां पडसे. (कामाला जायवे माजी ना नाय.पण...) आपले भुर्गेसाठी वेळ काडे हवो. संवाद साधे हवो. माया प्रेम देव्वे हवां. हे जर ज्या वेळाला हवां त्या वेळाला देव्वे मिळलां नाय, जाले जां हैवेचां तां हनारच. तेनां एकटेपणा जाणवसे. मोग मित्रपरिवार शोधसत. ती संगत बरी गावली जाले सगळां खरां. बरी गावली नाय जाले सगळां बिघडसे.

परिस्थिती मुळां शहरांत फ्लेटांत ऱ्हेव्वां लागसे, ना न्हुय. पण त्याहां ऱ्हेवनी सुद्धा आपली संस्कृती, चालीरिती, परंपरा जपोया. बरे माणूस हैवेचो प्रयत्न करूया. व्यायाम करनीं, वेळांत खाणापिणा करनीं निरोगी हैवेचो प्रयत्न करुया.

शिक्षण भरपूर घेव्वेचां पण आपल्या मायबोलीला विसरेचां नाय. वडिलोपार्जित जमीनी विकनी शहराचो ध्यास करूया नाकां. खेडेत ऱ्हेवनीं सुध्दा आपले कडा जिद्द, चिकाटी आणि सातत्य सेल जाले आपणही उंच उंच भरारी घेंव शकसों.
" सुख म्हणजे नक्की काय असतं, काय पुण्य केलं की ते घरबसल्या मिळतंय." असा एक मराठी गाणां से. घरात बेसोनीं, हातपाय न हालयता सुख मिळेचां नाय जाले तां कष्टांन, सत्कर्मान, सत्धर्मान ग्रामीण भागात ऱ्हेवनीं पण मिळयतां येसे. असां माजां वैयक्तिक मत से.

ह.भ.प. सौ. वंदना जोशी, खडकी - सत्तरी. गोवा.

# आठवणी

बंद कुप्यातल्यो आठवणी, येसत कयतरी भायेर
अणि मनात माजे रेंगाळसे, माजा मायाळू माहेर ||

गाडी घोडो नसतानां, मन माहेरा जासे
एकेक आठवण मोग, ताजीतर्तरीत हसे ||

गुंडेंचो खेळ अणि इस्पिकांचो डाव
खळेंत गजाली, चणेचां सांबारां-पाव ||

मारुतीचां देऊळ, पुढेंत पिंपळाचो पार
गोठेतले गंगा-मंगळ्याची, अमृत धार ||

भिजलेले गणवेशाचो, धुकटाचो वास
इवळीशी पुस्तकां, पोटापुरतो अभ्यास ||

कडकडीत उन्हाळेंतलां, थंडगार कुळागर
भुईचाफो, सुरंगान्चो, पसरलेलो परमळ ||

शिग्मेतली रोम्बटा, चतुर्थीच्यो घुमटार्ती
नवरात्रांतली भक्ती, दिवाळ्यांतली पणती ||

आठवणींचां पाखरू, पाऊस घेव्नी येसे
माहेराचे आठवणींत, मन चिंब भिजसे ||

भावना दातार
बेळगुंदी, बेळगाव

● ● ●

## चित्पावनी च्या संवर्धनासाठी गणपुले फाऊंडेशन चे उपक्रम

- चित्पावनी भाषेची तोंड ओळख – ऑनलाईन कार्यशाळा
- मासिक ऑनलाईन मीट
- चित्पावनी पाठयक्रम
- चित्पावनी त्रैमासिक
- चित्पावनी दिवाळी अंक २०२४
- www.chitpavani.org या संकेतस्थळाची सुरुवात

# नेगेटिव्ह एनर्जी



“कसलो वास येसे गो घरांत भितर सरतकच?” घोवान विचारलां अणि माला कसलो तरी वास येसे म्हणी कय्ळां. कोविड जालेउपरांत नाकाची वास घेव्वेची क्षमता मात्शी उणी जाली से. फोडणी जळली जाले शेजारणीला वास येसे पण माला येंत नाय!

संध्याकाळां बाबूनय विचारलांन अणि में मात्शी सादूर जाल्यां. मैत्रिणीला फोन मारलो. मैत्रिणींना एकीमेकींचीं सगळीं ‘सिक्रेट’ बी खबर ससत!

“अगो, घरांत नेगेटिव्ह एनर्जी बी सली जाले असले वास येसत! जाणस नी तूं? रामरक्षा बी म्हण! धूपबीप घाल घरांत!” त्याणिंन अदीकच भेश्टायलीन!

रात्रीची अकरा वरां जालेली! माजे दोळेंत येवनी बेसलेली निद. नेगेटिव्ह एनर्जी म्हण्टकच मुंबय काय दिल्ली पळोनी गेली कोण जाणे!

नेगेटिव्ह एनर्जी! कसली नेगेटिव्ह एनर्जी गो?” आवाज शक्य तितको शांत थेवनीं में विचारलां. “अगो म्हणजे भूत-पिशाच्च गो! सगळांच मगो समजावनी सांगेचां लागसे तुला! तुमचो अधिक शिकलेलेंचो होच प्रॉब्लेम! तूंच सांगत सलीस नी घरापाठल्यां वडाचां झाड से म्हणी?” ती माला सावध करसे काय माजीं फकाणां मारसे तांच कळत नाय जालां!

“आईकसय नी? उद्या लादी पुसताना इवळां मीठ घाल पाण्यांत. मिठाला लागोनी नकारात्मक ऊर्जा / नेगेटिव्ह एनर्जी नष्ट हसे खे. अणि तरीय बी वास जात नाय जाले कोणाला जाण्टेला विचारनी कितांय पूजाबिजा बी करेची उरली से काय बग! कय्ळां नी? निदव एतां!”

माजे तकल्यांत भुताचो किडो घालनी ही एतां माला निदव म्हणसे. “हर एक फ्रेंड कमीना होता है” हेंच खरां! असल्यो मैत्रिणी सल्यो जाले अणि दुस्मान बी कोण नाकां!

# .. नेगेटिव्ह एनर्जी

“आई, कोण सलो फोनावर? तुला कसली वाईट खबर सांगलीन काय कितां? तुजां तोंड असां वाईट की दिस्से ?” बाबून विचारलां.

कोण नाय रे. अंजली मावशी सली. “हां... अंजली मावशी टिचर, फिलॉसॉफर, दोतोर, वकील....अंजली मावश्याला सगळां खबर ससे. एतां आमचे घरांत वास येसे तो त्याचे घरांत पावयलोस नी? निदव तर एतां!” बाबू गेलो.

तश्यो सगळेच भुर्गेंना आवयच्यो अणि आवयला भुर्गेंच्यो खोडी खबर ससत! मोग माजो बाबू कसो अपवाद? माजे तकल्यांतलो भुताचो किडो में तेचे तकल्यांत घायलो नाय. तो ते नेगेटिव्ह एनर्जीहारीं फ्रेंडशिप बी मारनी दोगांय रात्रीं हँगआवट करुया म्हणीं जांव लागतील! (लोकांचीं भुर्गीं कशीं काय तेंचां व्यवस्थित आईकसत? माजोच बोड्यो मात्सो वेगळो!)

दुसरे दिवसा तो वास अणिकय जास्त येंव लागलो. बाबू जोड्याला सलोच! “आई, तो वास फक्त किचनांतच की येसे? तेणी आपण हॉलांत अणि बेडरुमांत येव्वेचो नाय असां थरयलान से का?”

कालपाष्णी किचनांत तो वास येंत सलो. उंदीर मरतकच कशी नष्ट घाण येसे तसो! सुटी ससे ते दिवस “मिशन साफसफाई’ म्हणी झाड, पूस, पड्डे बदल, चादरी बदल, डबे बदल, मदत करीत नाय म्हणी घोवावर-बोड्येवर राग काड - अशा बायलांचे विभागात ( कॅटेगरीत ) में नाय. म्हयनेंत्थीन एकदा शेजारणीचे कामवाल्याला बलावनी अशी साफसफाई में करनी घेसां. आज मात्र में सगळ्यो ट्रॉली भायेर काडल्यो, कोळीष्टकां काडलीं, गॅसावेल्लीं कॅबिनेटां निवळ केलीं, सगळां करनी जालां. पण तो वास मात गेलो नाय! एतां मात्र कसल्या तरी ‘वाईट शक्ती’न माजे किचनांत प्रवेश केलो काय कितां म्हणी माजे काळजांत धस्स जालां.

ते वाईट शक्तीला घराभायरी कशी करेची हो विचार करतां करतां दिवस सरलो. रात्रीं उशिरा (लेट) निदवल्यां. सकाळीं पाचांचो गजर वाजलो. माला सकाळीं उठक्कच नामस्मरण बी करपी लोक माला ग्रेट दिसस्त. कारण में पाचांना उठल्यां तरी पुडलीं पंधरा मिनिटां निदवलेलीच ससां. भरपूर आलां घालनी कडक चहा प्यालेशिवाय माला खरीखुरी जाग येंत नाय. आज मात्र में सकाळीं उठोनी देवाला उजवात दाखयली (लायली), मोबायलांत रामरक्षा सुरु केली. तरीय बी आज वास मात्सो वाढलो से काय, असां माला ओगीच दिसलां.

माजो बाबू माजेबरोबरीन उठसे. आज तेणीच चहा केलो.

“आई, तूं Conjuring बगलो सय?” चहा देताना तेणी विचारलान. “तो भुताटकीचो पिक्चर रे ? की सकाळीं सकाळीं भुतांचो विचार करसय? बरां देवाचां नांव घेव्वां रे!”

”मोग ती अंजली मावशी सांगत सली नी नेगेटिव्ह एनर्जी म्हणी. Conjuring पिक्चरांत तसांच दाखयलां से. आमी कें कें जासों त्याहां त्याहां ती नेगेटिव्ह एनर्जी येसे आमचे पाठल्यां”. तेणी माजेपाठीं उबो र्‍हेवनी ॲक्टिंग करनी दाखयलीन.

# .. नेगेटिव्ह एनर्जी

आदीच पयलीं रात्रीं सारकी नीद पडली नतली, अणि सकाळीं सकाळीं हेची ॲक्टिंग! एता माझी सटकली! तेला एक धेंगसो घायलो अणि माजीं कामां करुं लागल्यां. मध्यांच माजे पाठीं कोणतरी उबो से काय असो माला भास जालो. एक-दोनदा पाठी परतोनी बगलां पण कोणच नाय! कसो सनार? नेगेटिव्ह शक्ती अदृश्य सनार!

“अगो, में कितां म्हणसां.......”

“तुमी एतां कांयच म्हणोबिणो नाकां हां. आदी में रांदसां, उरलेली कामां सोंपयसां अणि मोग कितां तां आईकसां. माजी लिंक तुटली अणि कितेचां कितांय जालां जाले कितां रांदलां सय म्हणी बोलों लागणार. पोटली करनी गळेंत बांदनार मोग.....” निमाणो में सगळो राग माजे हक्काचे पंचिंग बॅगावर काडलोच!

“आई, तूं त्या रुक्मिणीला बलायली सय नी मद्‌तीला, तर त्याचे पुडेंत कांयच बोलों नाकां. काम कांय करेची नाय अणि सगळ्या सोसायट्यांत खबर पावयनार.”

केड्‌ला केड्‌ला माजो दीडशाणो बाबू खरोच शाणेसारको बोलसे!

दुपार हसे म्हणेसर त्या नेगेटिव्ह एनर्जीचो वास किचनाभायेरय येंव लागलो. में रुक्मिणीला किचन निवळ करे बलायली सली. पण किचन में कालच निवळ केलेलां. एतां त्याला कितां सांगों म्हणी विचार करसां म्हणेसर ती आयलीच!

“कितां गे वयनी! कसलो गे वास येसे एठा?”
“नकळे गे में. कालपाष्णी येसे. मान अणि कंबर मोडेसर सगळां सापसारलां तरीय येसे. कसली नेगेटिव्ह.......” “कितां?”
“नाय, नाय, कांय नाय. पाण्यांत इवळां मीठ घाल अणि पूस. बगूया जासे काय.”
“हरी! मीठान म्हणी केडला वास जासे तर! में तुला सांगसां, तूं सारखां निव्वळ केलां नसणार. में बग एतां कशी करसां ती!”

प्रत्येक कांबेरेला दिस्से की आपणच काय ती बरी काम करपी. रुक्मिणी तरी तेला कशी अपवाद सनार! ती बडबडत काम करुं लागली. पुसतां पुसतां त्याणी फ्रीज पुडां ओडलो. अणि फ्रीजाखायलो ट्रे भायेर काडलो. तेंत कसलां तरी हळदुवां पाणी सलां अणि तेलाच घाण येंत सली. फ्रीज निवळ करताना defrost करसत तेडला खालतीं पाणी जमा करे एक ट्रे ससे. में पाठले आठवडेंत फ्रीज स्वच्छ केलो सलो. म्हणजे तेड्‌लापाष्णी तां पाणी उरलां सलां काय? अणि में तां उडव्वे विसरल्यां! अरे देवा!

सों तेडा! रुक्मिणीन तो ट्रे निवळ केलो अणि आमचे घरांतली नेगेटिव्ह एनर्जी नाय नपश्यात जाली एकदम! भुतांबितां कांय खरी नस्सत, सगळे मनाचे खेळ ते लोकांचे! माजो जाले असल्या गजालींवर विश्वासच नाय! एतां मुद्दाम वेळ काडनी Conjuring बगे हवो!

सौ. वेदिका जोशी, मेरशी - गोवा.

## शब्द कोड्याचा उत्तर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| घो | आ | य | द | णां | दो |
| टु | आ | स | र | णां | ळो |
| रो | त | क | सु | ड | को |
| ना | प | मि | र | सां | गो |
| स | लां | स | ळा | थी | को |
| णो | प | ण | सु | लां | प |

उभे शब्द

१. घोटुरो - घरटं

२. नासणो - नाचणी

३. तपलां - पातेलं

४. दोळो - डोळा

५. कोप - कप

आडवे शब्द

१. आयदणां – भांडी (अनेक भांडी)

२. आसरणां - रेनकोट

३. सुडको - फडकं

४. मिरसांगो - मिरच्या

५. सळाथी - केरसुणी / झाडू

६. पणसुलां - फणस (अनेक फणस)

गणपुले फाऊंडेशन
फोन: +९१ ९९२० ३४५ ८६१
ईमेल: info@ganpulefoundation.org

चित्पावनी भाषेची तोंड ओळख ही कार्यशाळा
तुम्ही केली नसल्यास, खाली दिलेल्या लिंक वर
क्लिक करून गणपुले फाऊंडेशन च्या फेसबूक पेज
ला फॉलो करा म्हणजे पुढील कार्यशाळेबद्दल
माहिती तुम्हाला मिळेल.